# मेहता मराठी ग्रंथजगत

डिसेंबर, २०२४
पृष्ठे ६८ किंमत : रु.१५
वर्ष चोविसावे
अंक बारावा




## २०२४ मधील आवर्जून वाचावं असं काही...

## साहित्य पुरस्कारासाठी आवाहन



# ‘प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार’



‘मेहता पब्लिशिंग हाऊस’चे संचालक श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सन २०२४ पासून **‘प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार’** देण्यास सुरुवात झाली. या पुरस्काराची घोषणा १० जानेवारी, २०२३ रोजी डॉ. किरण बेदी यांच्या उपस्थितीत करण्यात आली होती.

या पुरस्काराचे स्वरूप खालीलप्रमाणे असून साहित्य क्षेत्रात प्रथम प्रकाशनास प्रोत्साहनपर हा पुरस्कार दिला जाणार आहे.

**सर्वोत्कृष्ट कादंबरी**
**₹ ३०,०००/-**

**सर्वोत्कृष्ट कथासंग्रह**
**₹ २०,०००/-**

### पुरस्कारासाठी अर्ज करण्यासंदर्भात प्राथमिक नियम व अटी :

१ ऑक्टोबर, २०२४ ते ३० सप्टेंबर, २०२५ दरम्यान प्रकाशित झालेली लेखकाची पहिली कादंबरी किंवा कथासंग्रह या पुरस्कारासाठी ग्राह्य धरली जाईल.

अर्ज स्वीकृतीची अंतिम तारीख : १ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत

पात्र इच्छुकांनी पुस्तकाची एक प्रत, संपूर्ण परिचय, संपूर्ण माहिती (नाव, पत्ता, संपर्क क्रमांक) आणि फोटो आमच्या पत्त्यावर पाठवावे.

या पुरस्काराची घोषणा डिसेंबर, २०२५ मध्ये केली जाईल.
१२ जानेवारी, २०२६ रोजी श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिदिनी पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे.

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ डिसेंबर २०२४ ◆ वर्ष चोविसावे ◆ अंक बारावा

**संपादक**
अखिल मेहता

**संस्थापक संपादक**
शंकर सारडा

**संपादन साहाय्य**
प्रतीक येतावडेकर

**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाइन पाठवावी.

**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**

***मेहता पब्लिशिंग हाऊस***

*— अनुक्रमणिका —*

| | |
|---|---|
| **संपादकीय** | **४** |
| **पुरस्कार** | **८** |
| **श्रद्धांजली** | **९** |
| **पुस्तकाच्या पानांतून** | |
| द हंग्री टाइड | १२ |
| तेलगी स्कॅम | १८ |
| गंधर्वगाथा | ३० |
| चंबळेच्या पलीकडे | ४२ |
| स्फिंक्स | ५० |
| **दिनविशेष** | **६१** |

संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२ I E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.



# संपादकीय

## २०२४ सरताना...

वर्षाचा शेवटचा महिना. या महिन्याची चाहूल लागते ती पुण्यात होणाऱ्या महोत्सवांनी, यात पुणे पुस्तक महोत्सव व सवाई गंधर्व संगीत महोत्सव यांचा समावेश होतो. साहित्य आणि संगीत याला वाहिलेले हे दोन प्रसिद्ध असे महोत्सव. यंदाही पुणे पुस्तक महोत्सव आयोजित केला गेला आहे. गतवर्षीच्या वाचकांचा उदंड प्रतिसाद पाहता या वर्षीही त्या महोत्सवाबद्दल विशेष अशी अपेक्षा आहे. या प्रकारच्या ग्रंथमहोत्सवाच्या माध्यमातून वाचकांची वाचनाची भूक भागवली जाते असे म्हटल्यास ते वावगे ठरणार नाही.

या वर्षी मेहता पब्लिशिंग हाऊसने वर्षभरात विविधांगी विषयांवरील पुस्तके प्रकाशित केली. बनगरवाडी, शाहू महाराजांच्या आठवणी, द हिडन हिंदू-कादंबरीमाला, गोपीची डायरी - एक उनाड दिवस, व्हिक्टरी सिटी ही त्यातील वानगीदाखल काही नावं. ग्रामीण लेखक व नवकथेचे शिलेदार व्यंकटेश माडगूळकर यांची समग्र पुस्तके आमच्या प्रकाशनसंस्थेने प्रकाशित केली. हा प्रकल्प २०१२ साली पूर्णत्वास आला होता. या पुस्तकांत 'बनगरवाडी' हे पुस्तक वगळता माडगूळकरांची सर्वच पुस्तके होती. 'बनगरवाडी' हे पुस्तक अलीकडेच आम्ही प्रकाशित केलं. नव्या रंगात, नव्या ढंगात आलेलं हे पुस्तक वाचकांच्या पसंतीस उतरलं आहे. दीनानाथ दलाल यांनी रेखाटलेली रेखाचित्रे व मुखपृष्ठ यांची

पुनर्मांडणी चंद्रमोहन कुलकर्णी यांनी केली आहे.

डॉ. जयसिंगराव पवार यांनी संपादित केलेलं 'शाहू महाराजांच्या आठवणी' हेही खास असं पुस्तक. राजर्षी शाहू महाराजांचा सहवास लाभलेल्या समकालीन लोकांनी सांगितलेल्या आठवणी या पुस्तकात आहेत. ११४ आठवणींमधून लोकराजा, समतादूत, न्यायप्रेमी अशी शाहू महाराजांची प्रतिमा आपल्याला भावते. या पुस्तकाचं प्रकाशन नवी दिल्ली येथे महाराष्ट्र सदनात, राजर्षी शाहू महाराजांचे वंशज खासदार श्रीमंत शाहू छत्रपती यांच्या हस्ते झालं ही एक गौरवास्पद बाब. २६ जून रोजी हा सोहळा पार पडला. शाहू महाराजांच्या जयंतीचं औचित्य व या पुस्तकाचं प्रकाशन असा एक उत्तम योग या निमित्ताने जुळून आला.

मेहता पब्लिशिंग हाऊसच्या अनुवादिका लीना सोहोनी व सुनंदा अमरापूरकर यांची अनुक्रमे 'अनुवादातून अनुसर्जनाकडे' आणि 'खुलभर दुधाची कहाणी'ही आत्मकथने प्रसिद्ध झाली. या दोन्ही अनुवादिकांची ही स्वतंत्र पुस्तके. वाचकांचा या दोन्ही आत्मकथनांना चांगला प्रतिसाद मिळाला आहे.

सलमान रश्दी यांचे 'व्हिक्टरी सिटी' हेही एक विशेष पुस्तक. सलमान रश्दी यांच्या पुस्तकांच्या मराठीतील अनुवादाचे व प्रकाशनाचे हक्क हे मेहता पब्लिशिंग हाऊस यांच्याकडे आहेत ही गोष्ट इथे आवर्जून नमूद करावीशी वाटते. या पुस्तकांपैकी 'व्हिक्टरी सिटी' हे पुस्तक अलीकडेच बाजारात आणलं. या प्रकारच्या पुस्तकांना वाचकांचा कायमच चांगला प्रतिसाद मिळत असतो.

सुधा मूर्ती यांचं 'गोपीची डायरी' हे पुस्तक मागील वर्षी प्रकाशित झालं. याच पुस्तकाचा पुढील भाग 'गोपीची डायरी - एक उनाड दिवस' हे बालवाचकांसाठी असलेलं पुस्तक प्रकाशित झालं आहे. त्याचबरोबर सुधा मूर्ती यांचंच 'आजोबांच्या पोतडीतील गोष्टी' हेही एक नवं पुस्तक याच महिन्यात वाचकांसाठी आणलं आहे. सुधा मूर्ती यांच्या साहित्याचा विशेष असा एक वाचकवर्ग आहे. सुधा मूर्ती यांची पुस्तकं म्हणजे मराठी वाचकांसाठी खास मेजवानीच असते.

अक्षत गुप्ता लिखित 'द हिडन हिंदू' ही कादंबरीमाला याच वर्षी प्रकाशित झाली. पौराणिक पार्श्वभूमी असलेली, थ्रिलर स्वरूपात मांडली गेलेली सप्तचिरंजीवांची कहाणी. यातून आठव्या चिरंजीवाचा घेतलेला

शोध ही एक हटके अशी कल्पना. या कादंबरीमालेचे अनुक्रमे १,२ व ३ असे भाग प्रकाशित झाले. या स्वरूपाच्या लिखाणाची वाचकांना मोहिनी असल्याचे विशेष रूपाने जाणवले. या पुस्तकांना ऑनलाइन, ऑफलाइन स्वरूपात असलेल्या प्रचंड मागणीमुळे या पुस्तकांनी वाचकांना प्रचंड भुरळ घातल्याचे लक्षात आले. सहा महिन्यांच्या आत या पुस्तकांच्या तीन आवृत्त्या आम्ही प्रकाशित केल्या, ही विशेष बाब आहे.

मेहता पब्लिशिंग हाऊसच्या परंपरेला साजेशा स्वरूपात नवनवी पुस्तके प्रकाशित करण्याचा आमचा कायमच प्रयत्न असतो. त्याला अनुसरून वर्षभरात विविध विषयांची पुस्तके वाचकांसाठी आम्ही घेऊन येतच असतो. सरत्या वर्षातही ही विविधता आम्ही जपली. नववर्षातही नवा आशय, नवे विषय असलेली पुस्तके आम्ही आपल्या वाचकांसाठी आणणार आहोत.

सर्व वितरकांना, वाचकांना, हितचिंतकांना इंग्रजी नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!!

अखिल मेहता

## नवी संहिता... नवा आशय...

# स्माइल प्लीज




### सुप्रिया वकील

जीवनातले प्रसंग हलकेफुलके...
चेहऱ्यावर आणतात 'स्माइल' हलकेसे

**किंमत : २२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# थ्रिल्स




### महादेव मोरे


कथा गुन्हेगारांच्या... 'थ्रिल' अनुभवायला लावणाऱ्या

**किंमत : २२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# पुरस्कार

## डॉ. जयसिंगराव पवार


ज्येष्ठ इतिहास संशोधक-लेखक डॉ. जयसिंगराव पवार यांना यशवंतराव



चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांचा यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. डॉ. पवार यांचे मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे मन:पूर्वक अभिनंदन!

## मंजुश्री गोखले

ज्येष्ठ लेखिका मंजुश्री गोखले यांना त्यांच्या ‘समर्थ’ या कादंबरीसाठी




मातृमंदिर विश्वस्त संस्था, निगडी यांचा ललित साहित्यकृती पुरस्कार प्रदान करण्यात आला. मंजुश्री गोखले यांचे मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे मन:पूर्वक अभिनंदन!

◆

# श्रद्धांजली

## वीणा देव

पुणे : लेखिका, समीक्षक वीणा देव यांचे ऑक्टोबरमध्ये निधन झाले. पुण्यातील शाहू मंदिर महाविद्यालयात त्यांनी ३२ वर्षे मराठीचे अध्यापन केले. 'मराठी कथा-कादंबऱ्यांची नाट्यरूपे' या विषयावर त्यांनी पीएच.डी. प्राप्त केली. लेखन, संकलन आणि संपादन हे तीनही प्रकार त्यांनी लीलया हाताळले. गो.नी. दांडेकर यांच्यावर लिहिलेल्या त्यांच्या 'आशक मस्त फकीर' या व्यक्तिचित्रास महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट ललित साहित्य निर्मितीचा पुरस्कार मिळाला. महाराष्ट्राच्या मराठी राजभाषा सल्लागार समितीच्या त्या माजी सदस्य होत्या. ठाणे जिल्हा आणि विटा येथील ग्रामीण साहित्य संमेलनाचं अध्यक्षपद त्यांनी भूषवलं होतं. आकाशवाणी आणि दूरदर्शनवर मुलाखती, सूत्रसंचालनाच्या माध्यमातून त्यांनी सहभाग नोंदवला. गो. नी. दांडेकरांच्या विविध कादंबऱ्यांचे अभिवाचन, मृण्मयी पुरस्कार, दुर्ग साहित्य संमेलन, गोनीदा यांच्या छायाचित्रांचं प्रदर्शन, मृण्मयी प्रकाशनातर्फे गोनीदांच्या दुर्मिळ साहित्याचं प्रकाशन या सगळ्या उपक्रमांतून आपल्या साहित्यिक पित्याची स्मृतिज्योत त्यांनी तेवत ठेवली.

मेहता पब्लिशिंग हाऊसने वीणा देव यांचं 'स्वान्सीतील दिवस' हे प्रवासवर्णन प्रकाशित केलं. त्यांना मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे विनम्र आदरांजली!

◆

# मेहता मराठी ग्रंथजगत

नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी
आजच वर्गणीदार व्हा.

आमच्या छापील अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ४५० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ६०० रुपये**

डिजिटल अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ४०० रुपये**

***Available on***

amazonkindle | Google Play Books

Find us on: facebook®

https://www.facebook.com/mehtapublishinghouse

# मेहता पब्लिशिंग हाऊस

BOOK CLUB

या क्लबचे सभासद व्हा.
आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके
निम्म्या किमतीत मिळवा!

## टी बुक क्लब

आजच व्हा सदस्य,
निम्म्या किंमतीत
मिळवा पुस्तकं


* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक

**टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!**

₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा
सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.

फोन : (०२०) २४४७६९२४  ९४२०५९४६६५

सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -
www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx





नाहीत स्कॅन केलेली पाने
किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच,
खरीखुरी **eBooks**
युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर –
थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड,
किंडल आणि अ‍ॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

ebook available on :

amazonkindle | Get it on Apple Books | Google Play Books

## पुस्तकाच्या पानांतून




# द हंग्री टाइड

**अमिताव घोष**

अनुवाद

**सुनील करमरकर**

*निसर्गभान आणि मानवी जाणिवांचं दोलायमान वास्तव स्पष्ट करणारी सुंदरबनच्या नयनरम्य काठावर घडणारी बहुचर्चित कादंबरी*

### भरती-ओहोटीचा देश

फलाटावर उतरल्या क्षणीच कनाईनं तिला बघितलं. एखाद्या किशोरवयीन मुलासारखा ढगळ टीशर्ट-पॅन्ट घातलेला तिचा पेहेराव किंवा तिचे बारीक कापलेले काळे केस यातलं काहीच त्याला फसवू शकलं नाही. फलाटावर खाद्यपदार्थ आणि चहा विकणाऱ्या विक्रेत्यांमधून त्याची नजर अचूकपणे तिच्या सडपातळ बांध्यावर स्थिरावली. तिचा चेहरा

थोडासा लांब, निमुळता होता आणि केशसंभाराशी विसंगत असं तिचं लावण्य होतं. तिच्या कपाळावर कुंकवाची टिकली नव्हती की हातात बांगड्यादेखील नव्हत्या. पण तिच्या रापलेल्या कांतीवर कानातलं चंदेरी कर्णफूल ठसठशीतपणे चमकून दिसत होतं.

ती ज्या पद्धतीनं स्वत:चा आब राखून होती त्यामुळे त्याची उत्सुकता वाढली आणि एखादं शब्दचित्र रेखाटल्याप्रमाणे, स्त्रियांची मार्मिक स्तुती करण्याची हातोटी अवगत असलेली स्वत:ची कला त्याला सुखावून गेली. तिच्या गव्हाळ अंगकांतीमुळे आणि कानात कर्णफुलं असूनदेखील ती भारतीय वंशाची नसावी असं त्याला वाटलं. उंच टाचांच्या चपलांवर फ्लायवेट बॉक्सरप्रमाणे उभं राहण्याची तिची पद्धत पाहता ती परदेशी आहे यावर शिक्कामोर्तब होत होतं. कदाचित कलकत्त्याच्या पार्क स्ट्रीटवर कॉलेजच्या मुलींच्या गर्दीत ती वेगळी वाटली नसती. पण या काळ्या कळकट ढाकुरीया स्टेशनवर तिचं विदेशी सुडौल स्त्रीसौंदर्य वेगळेपणाने उठून दिसत होतं.

दक्षिण कलकत्त्याच्या स्टेशनवर कॅनिंगला जाणाऱ्या गाडीची वाट बघत एखादी तरुण, परदेशी मुलगी का बरं वाट बघत असावी? सुंदरबनला जाण्यासाठी ही एकमेव रेल्वेलाईन होती हे अगदी खरं होतं. पण त्याच्या माहितीप्रमाणे पर्यटक याचा उपयोग करीत नसत. जे कोणी तिकडे जायचे ते कलकत्त्याच्या नदीकिनाऱ्यावरून स्टीमर (बोट) भाड्याने घेऊन जायचे. ट्रेनचा वापर जास्त करून आजूबाजूच्या गावात राहणारे, दररोज प्रवास करणारे प्रवासी शहरात जाण्यासाठी करायचे.

शेजारी उभ्या असलेल्या व्यक्तीला काहीतरी विचारताना त्याने तिला पाहिलं. ते ऐकण्याची त्याची उत्सुकता वाढली. भाषा ही त्याची रोजीरोटी आणि व्यसन दोन्ही होतं आणि सार्वजनिक ठिकाणी चाललेलं संभाषण चोरून ऐकण्याची ऊर्मी त्याला आवरत नसे. गर्दीतून वाट काढत तो तिचं बोलणं ऐकायच्या टप्प्यात येईपर्यंत त्याला 'कॅनिंगची ट्रेन?' एवढेच शब्द ऐकू आले. एकाने खांदे उडवत, हातवारे करीत सांगण्याचा प्रयत्न केला, पण ते बंगालीत असल्यामुळे तिला कळलं नाही. 'मला बंगाली येत नाही' एवढंच तिनं त्या माणसाला थांबवत क्षमायाचनेच्या सुरात सांगितलं. तिच्या हावभावावरून आणि उच्चारांवरून सगळ्या आगंतुक लोकांसारखं ती जेमतेम आवश्यक तेवढीच बंगाली भाषा शिकलेली आहे हे त्यानं ओळखलं.

प्लॅटफॉर्मवरील इतरांसारखाच कनाईदेखील एक आगंतुक होता. पण त्यानं लगेचच स्वत:कडे लक्ष वेधून घेतलं. त्याचा बांधा भक्कम होता आणि बेचाळीसाव्या वर्षी त्याचे केस घनदाट होते. पण कपाळावरील केसांमधून एखादी रुपेरी छटा दिसायला सुरुवात झाली होती. त्याचं किंचित कललेलं डोकं आणि त्याची उभं राहण्याची पद्धत कोणत्याही परिस्थितीशी सामना करण्याची त्याची क्षमता ठामपणे दर्शवित होती. चेहऱ्यावर नसल्या तरीही त्याच्या डोळ्यांच्या बाजूला सूक्ष्म सुरकुत्या होत्या. पण त्या रेषा त्याचं वय दर्शविण्यापेक्षा त्याचं तारुण्य जास्त खुलवायच्या. एके काळी त्याची शरीरयष्टी थोडीफार कमावलेली होती, तरी गेल्या काही वर्षात कमरेवर जाडी वाढलेली होती. पण तरीही तो एखाद्या दक्ष पर्यटकासारखा चुस्त होता.

कनाईकडे चाकं असलेली हँडलवाली बॅग होती. कॅनिंग स्टेशनवरच्या वस्तू विक्रेत्यांमध्ये ही बॅग म्हणजे त्याच्या गॉगल लावलेल्या, कॉड्राय जीन्स आणि स्यूड बूट घातलेल्या, शहरी संपन्नता आणि मध्यमवयीन श्रीमंती दाखवणाऱ्या अनेक विशेषांपैकी एक होती. याचा परिणाम म्हणून तिथे असणारे विक्रेते, लहान मुलं, वेगवेगळ्या कारणांनी मदत मागणाऱ्या मुलांचा गट, यांनी त्याला घेराव घातला. हिरव्या-पिवळ्या रंगाची ट्रेन स्टेशनमध्ये आली, तेव्हाच या सगळ्या भंडावून सोडणाऱ्या लवाजम्यातून त्याची सुटका झाली.

ट्रेनमध्ये चढताना त्याच्या एक गोष्ट लक्षात आली की ती परदेशी तरुणी प्रवासाला सराईत होती. तिने तिच्याभोवती घुटमळणाऱ्या पाच-सहा हमालांना बाजूला सारत दोन मोठ्या बॅगा पाठीवर उचलल्या. तिच्या सडपातळ, लहान चणीमुळे फसगत होत असली तरी तिच्या हातांमध्ये भरपूर ताकद होती. गर्दीनं भरलेल्या कंपार्टमेंटमध्ये ती सराईतपणे दोन्ही बॅगांसह आत शिरली. स्त्रियांकरिता स्वतंत्र कंपार्टमेंट असतं हे तिला सांगण्याची त्याला क्षणभर इच्छा झाली, पण तेवढ्यात ती आत शिरल्याने त्याच्या दृष्टीआड झाली.

गाडीनं शिट्टी वाजवली आणि कनाई मोठ्या धैर्याने गर्दीला तोंड देत आत शिरला आणि एक जागा बघून ताबडतोब तिथे बसला. प्रवासामध्ये बॅगेतील काही कागद काढून वाचन करायचा त्याचा विचार होता. पण त्या दृष्टीने त्याची जागा अगदीच अयोग्य होती. तिथं पुरेसा प्रकाश नव्हता आणि त्याच्या बाजूला बसलेल्या बाईचं मूल रडत होतं. त्या हवेत उडणाऱ्या

बाळमुठींचा सामना करीत वाचनात लक्ष लागणार नाही याची त्याला खात्री होती. त्याच्या लक्षात आलं की डाव्या बाजूला खिडकीजवळची जागा त्याच्या दृष्टीनं अगदी योग्य होती. पण तिथं एक बंगाली गृहस्थ आधीच वर्तमानपत्र वाचत बसला होता. त्या मध्यमवयीन, सभ्य दिसणाऱ्या गृहस्थाकडे पाहून कनाईला क्षणभर वाटलं की याला विनंती केली तर तो नाही म्हणणार नाही.

आवाजात पुरेपूर मार्दव आणत, शेजाऱ्याशी झुकत लाघवीपणे त्यानं विचारलं, ''अरे बाबूमोशाय, तुमची काही हरकत नसेल तर जागेची अदलाबदल करायला आवडेल तुम्हाला? इथं खिडकीजवळ भरपूर उजेड आहे आणि मला थोडं काम करायचं आहे.'' त्या वर्तमानपत्र वाचणाऱ्या गृहस्थाने आश्चर्याने त्याच्याकडे बघितलं. तिथून उठायला तो विरोध करेल असं त्याला क्षणभर वाटलं. पण कनाईचा पेहराव आणि त्याचं व्यक्तिमत्त्व बघता त्यानं स्वत:चा विचार बदलला. या माणसाची वरपर्यंत ओळख असावी, हा कोणीतरी पोलीसवाला, राजकारणी किंवा इतर महत्त्वाची व्यक्ती असावी असं त्याला वाटून मोठ्या सभ्यपणे त्याने कनाईला खिडकीजवळची जागा देऊ केली.

काही खळखळ न करता जागा मिळाल्याचं कनाईला समाधान वाटलं. त्या गृहस्थाचे आभार मानत त्याने खिडकीबाहेरील चहावाल्याला हाक मारली आणि सूटकेसच्या बाहेरील कप्प्यातील नीटपणे बांधलेले काही कागद काढून व्यवस्थितपणे मांडीवर पसरून वाचायला सुरुवात केली.

'आपल्या पुराणकथांमध्ये असं म्हटलं आहे, की भगवान शंकरानी स्वर्गातून उतरणाऱ्या गंगेच्या जोरदार प्रवाहाला त्यांच्या भस्मांकित जटांमध्ये सामावून घेतलं नसतं, तर तिने धरणी दुभंगून टाकली असती. ह्या कथेमागची कथा समजून घ्यायची असेल तर नदीला वेणीच्या स्वरूपात पाहायला हवं. जणू काही तहानलेल्या प्रदेशातून वाहणारी पाण्याची वेणीच. नदी जेव्हा तिच्या अंतिम चरणामध्ये पोहोचते, तेव्हा ही कथा वेगळे वळण घेते. कथेतील हा भाग कायमच अद्‌भुत असतो कारण तो कधीच सांगितला अथवा कल्पिला जात नाही. तो भाग म्हणजे : या चरणामध्ये शिवाच्या जटा विशाल, जाळीदार होतात. या टप्प्याच्या पुढे नदी सर्व बंधनं तोडून हजारो जटांमध्ये विभागली जाते.

तुम्ही स्वत: अनुभव घेत नाही, तोपर्यंत अविश्वसनीय वाटावा असा एक

अद्‌भुत द्वीपसमूह बंगालचा उपसागर आणि जमीन यांमध्ये वसलेला आहे. बांगलादेशाच्या मेघना नदीपासून कलकत्त्याच्या हुगळी नदीपर्यंत जवळजवळ तीनशे कि.मी लांबीच्या पट्ट्यामध्ये एकमेवाद्वितीय असा हा द्वीपसमूह आहे. जणू काही भारताच्या साडीचे किंवा ओढणीरूपी जीर्ण वस्त्राचे, अर्धेओले अखेरचे धागेच जणू. हजारोंच्या संख्येने असलेले हे द्वीप. काही मोठे तर काही वाळूच्या दांड्यासारखे. काहींना शेकडो वर्षांचा इतिहास तर काही वर्ष-दोन वर्षांत धुवून जाणारे. हे द्वीप म्हणजे नदीने धरतीकडून घेतलेल्या दानाची अशी भरपाई की ज्यावर तिचीच कायम सत्ता राहील.

या नदीच्या प्रवाहांचं असं काही सूक्ष्म जाळं पसरलं आहे, की कायम अगम्य आणि स्वत:मध्ये सतत बदल घडवणाऱ्या, जमीन आणि पाणी यांच्या धूसर सीमारेषांचा प्रदेशच जणू. यातले काही प्रवाह खूप मोठे आहेत. इतके मोठे की एका तीरावरून दुसरा तीर दिसत नाही. तर काही दोन-तीन कि.मी लांबीचे आणि काही मीटर रुंदीचे. तरीही प्रत्येक प्रवाह हा एक स्वतंत्र नदी आहे. प्रत्येकाला स्वत:चं एक वैचित्र्यपूर्ण नाव आहे. कधी चारपाच, तर कधी सहा प्रवाह बऱ्याच वेळेला एकत्र येतात. त्यातील पाणी जमिनीच्या खूप आतपर्यंतच्या पट्ट्यामध्ये शिरते आणि त्यातील जंगलं म्हणजे एक विरत जाणारी दंतकथा बनतात. तिथल्या स्थानिक भाषेत अशा संगमांना 'मोहना' म्हणतात. अनेक फसवे पदर असलेला, भुरळ घालणारा शब्द.

इथं गोडं आणि खारं पाणी, नदी वा समुद्र विभागणाऱ्या सीमारेषा नाहीत. भरतीचं पाणी दररोज जवळजवळ तीनशे कि.मी. पर्यंत आतमध्ये घुसतं आणि त्यामुळे हजारो एकर जंगल पाण्यात बुडतं आणि काही तासांनी पुन्हा वर येतं. द्वीपांचा आकार दररोज बदलू शकेल इतका पाण्याचा प्रवाह जोरदार असतो. कधी तो भूशीर आणि द्वीपकल्प उसवतो तर कधी तो पूर्वी काही नसलेल्या ठिकाणी नवीन पट्टे आणि वाळूचे दांडे तयार करतो. असे नवीन द्वीपकल्प तयार झाले की रातोरात तिथे कांदळवनाची रुजवण व्हायला सुरुवात होते. सभोवतालची परिस्थिती अनुकूल असेल तर काही वर्षांतच या द्वीपांवर त्यांची जोमाने वाढ होते. ही कांदळवनं म्हणजे स्वत:तच सामावलेलं एक जग असतं. इतर जंगलांपेक्षा सर्वस्वी निराळं.

ही एकमेकांत गुंतलेली, पर्णसूचींसारखी, रानफुलांसारखी वरवर वाढणारी नसतात किंवा इथे पक्ष्यांचा किलबिलाट किंवा माकडांचा गोंधळही नसतो. कांदळवनाची पानं राकट,कातडीसारखी असतात. फांद्या गाठीयुक्त असतात. पर्णसंभार अतिशय अगम्य आणि घनदाट असतो. इथं दृश्यमानता कमी असते आणि हवा स्तब्ध आणि कुबट असते. मानवाच्या अस्तित्वाविषयी या भूप्रदेशाने मांडलेले शत्रुत्व, त्याचा धूर्तपणा, त्याची उपलब्ध संसाधने आणि मानवाला नष्ट वा निष्कासित करण्याचा त्याचा निर्धार याविषयी माणसे कुठल्याही क्षणी शंका घेऊ शकत नाहीत. दरवर्षी डझनावारी माणसं या कांदळवनाच्या घनदाट आलिंगनात अदृश्य होतात, वाघाची शिकार होतात किंवा सर्पदंशाने मरतात.


इथे बाहेरच्या माणसाने यावं असं कोणतंही सौंदर्य नाही. तरीपण जग या द्वीपसमूहाला 'सुंदरबन' या नावानं ओळखतं. 'सुंदरबन'- सुंदर जंगल. काहींचं मत असं आहे, की इथं उगवणाऱ्या सुंदरी- *Heriteria minor* या वनस्पतीमुळे याला 'सुंदरबन' नाव मिळालं. पण सध्याचा त्याचा फैलाव पाहता या शब्दाच्या व्युत्पत्तीवर विश्वास ठेवणं कठीण आहे. मुघल बादशहांच्या दप्तरामध्ये याचा संदर्भ झाडाशी नव्हे तर ओहोटीशी जोडला आहे. इथल्या रहिवाशांच्या मते हा प्रदेश भाटीर देश – म्हणजे ओहोटीचा प्रदेश आहे. भाटी म्हणजे फक्त ओहोटी नव्हे, तर उधाणाच्या भरतीमध्ये ज्या वेळी जमीन पाण्यात अर्धवट बुडालेली असते, त्या वेळी जंगलाला जन्म देणारं उतरतं पाणी अशी ओहोटी. चंद्ररूपी आयाच्या निगराणीखाली वैचित्र्यपूर्ण जंगलाचा जन्म होण्याची प्रक्रिया म्हणजेच tide country- भरती-ओहोटीचा प्रदेश यथार्थपणे समजून घेण्याची गरज आहे.*

आनंदाची रास  चढतच राहावी
अशी आस असणारे  आपण,
सुख पदरात पडलं तर,
जातो पुरते गोंधळून

*German poet with mystic lyricism (1875-1926)

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# तेलगी स्कॅम
## रिपोर्टरची डायरी

**संजय सिंह**

अनुवाद

**मंजिरी धामणकर**

*डान्सबारमध्ये एका वेळी ८४ लाख उडवणारा तेलगी* ते संपूर्ण यंत्रणेला भ्रष्टाचाराने पोखरणारा घोटाळेबाज... *तेलगी महाघोटाळ्याची पोलखोल करणारा एका शोध पत्रकाराचा थक्क करणारा आँखोदेखा हाल...*

✍ साल २००४

जोगेश्वरी-विक्रोळी लिंक रोडवर उभ्या असलेल्या मंदारला क्वालिस गाडीवाल्याने गाडीत घेतले. गाडीत बसल्याबरोबर मंदारला

गियरच्या जवळच ठेवलेली AK-५६ दिसली.

"भरलेली आहे?" मंदारने विचारले.

"ठेवावीच लागते."

"महाराज, एकटेच? बॉडीगार्ड?" (मुंबई पोलिसांत साळस्करांना 'महाराज' म्हणून ओळखले जायचे)"

मंदारचा प्रश्न पूर्ण होण्याआधीच साळस्कर म्हणाले, "गरज नव्हती." साळस्करांनी गियर टाकला. गाडी निर्जन रस्त्यावर धीम्या गतीने चालू लागली. मुंबईचे एनकाउन्टर स्पेशालिस्ट विजय साळस्कर. साळस्करांनी केलेल्या एन्कौन्टर्सची संख्या, शतकाच्या उंबरठ्यावर असलेली त्यांची प्रतिस्पर्धी जोडी प्रदीप शर्मा- दया नायक यांच्या एनकाउन्टर्सपेक्षा अर्धीच होती. पण साळस्करांच्या एनकाउन्टर्समध्ये आलतूफालतू नव्हे, तर मोठी नावे अधिक होती. ज्यात गुंड अमर नाईक, सदा पावले, विजय तांडेल आणि बंड्या अडीवाडेकर अशा मोस्ट वॉन्टेड गुन्हेगारांची नावे सामील होती. याच कारणामुळे पोलीस वर्तुळात साळस्करांच्या नावाचा दबदबा होता. ते इतके धाडसी होते, की अशा प्रसंगी बहुतेक वेळा एकटेच काम करायचे. गाडीचे स्टेअरिंग फिरवून यू टर्न घेत त्यांनी विचारले,

"पुस्तक आणलं?"

"हो," असे म्हणून मंदारने शर्टच्या आतून पुस्तक काढले.

साळस्करांनी गाडी चालवताचालवताच पुस्तक बघितले. मुखपृष्ठावर तेलगीचा फोटो होता आणि त्याच्यासमोर एनडी टीव्हीचा एक माईक दिसत होता.

"तुम्ही घेऊन जाऊ नका, वाचून परत द्या." मंदार म्हणाला.

"अरे, आत्ता पूर्ण कुठे वाचणार?" उत्तर मिळाले.

"याच्या पहिल्या आवृत्तीचे उद्या संध्याकाळी चार वाजता प्रकाशन आहे, त्याआधी कोणाला प्रत देणार नाही, असं वचन देऊन पुस्तक आणलं आहे."

विजय साळस्करांनी मातोश्री क्लबच्या पार्किंग झोनमध्ये गाडी उभी केली. गाडीतला दिवा लावून मोबाइलवर नजर टाकली. रात्रीचे पावणेबारा वाजले होते. पुढचे दोन तास ड्राइव्हिंग सीटवर बसून साळस्कर पुस्तक वाचत होते आणि शेजारच्या सीटवर बसून मंदार पेंगत होता.

गाडी स्टार्ट झाल्याच्या घरघरीने मंदारची झोप मोडली. सीटवर सरळ

बसत त्याने विचारले, ''तुम्ही याच्यात कशाला पडलात? तुमचं तर यात काहीच नाही. जे काही आहे, ते तुमच्या समोरच्या गटाचं आहे.'' मंदारचा रोख साळस्करांच्या विरोधी गटाकडे होता.

पुस्तक मंदारच्या मांडीवर ठेवत ते म्हणाले, ''म्हणूनच वरिष्ठांनी मला सांगितलं आहे, की 'हानी पोहचेल असं या पुस्तकात आणखी काय असू शकेल याचा पत्ता लावा.' त्यांना वाटतं की तुम्हा लोकांशी माझं चांगलं पटतं.''

''काय सांगता!'' पुस्तक पुन्हा शर्टाच्या आत लपवत मंदारने विचारले.

''भैयाने सगळं काही रोखठोक लिहिलं आहे.'' साळस्कर* म्हणाले.

''उद्या संध्याकाळी कार्यक्रमाला या. लेखकाच्या स्वाक्षरीची प्रत देतो.'' मंदार हसत म्हणाला.

''येडा आहेस का?'' असे म्हणत साळस्करांनी RNA हाइट्स इमारतीसमोर गाडी थांबवली.

मंदार उतरला, इमारतीचे गेट उघडून आत गेला आणि क्वालिस गाडी पुढे निघून गेली.

घरात जाऊन मंदारने शर्टच्या आतून पुस्तक काढले आणि टीव्हीसमोर फेकून तो विचार करू लागला, नशिबाने साथ दिली असती, तर ज्या पुस्तकाच्या प्रकाशनापूर्वीच त्यातील मजकूर जाणून घेण्यासाठी पोलीस खाते अधीर होते, त्या पुस्तकाच्या लेखकाच्या जागी त्याचे नाव असते. रात्री दोन वाजता काहीतरी बघण्यासाठी त्याने टीव्ही लावला, तेव्हा टीव्हीच्या प्रकाशात पुस्तकाचे शीर्षक चमकले – 'तेलगी घोटाळा : पत्रकाराची डायरी.'

## ✍ २९ मार्च २००३, शनिवार : शेवटाची सुरुवात

तो दिवस एखाद्या सामान्य दिवसाप्रमाणेच उजाडला होता. निदान माझ्या आयुष्यात तरी निश्चितच. तेव्हा मी एनडी टीव्हीसाठी काम करत होतो. एनडी टीव्ही तोपर्यंत सॉफ्टवेअर प्रॉडक्शन हाउसपर्यंतच सीमित होता. आम्ही मुख्यत: स्टार न्यूज वाहिनीसाठीच काम करत होतो. मला एनडी टीव्हीमध्ये काम करायला लागून अडीच वर्षे झाली होती. दुसऱ्याच दिवशी, म्हणजे ३० मार्चला आमचा (एनडीटीव्हीचा) स्टार टीव्हीबरोबरचा करार

संपणार होता. रविवारी माझी सुट्टी होती, म्हणजेच आज माझा स्टार न्यूजचा शेवटचा दिवस होता. म्हणून, माझ्याही कायम स्मरणात राहील आणि जाताजाता बाकी वाहिन्यांना देखील एक चांगला झटका देऊ शकेल, अशी एखादी बातमी त्या दिवशी देण्याची माझी इच्छा होती. पण त्या शनिवारी माझ्या हाती एकच बातमी लागली होती – स्विस कपल केस. ही केस होती बाल लैंगिक शोषणाची. त्यात एका म्हाताऱ्या स्विस जोडप्यावर बाल लैंगिक शोषणाचा आरोप होता. त्याच खटल्याचा आज कोर्टात निकाल जाहीर होण्याची शक्यता होती.

मला जरा निरुत्साही वाटत होते. सेशन कोर्टात माझ्याव्यतिरिक्त बरेच टीव्ही पत्रकार जमले होते. सकाळी दहा वाजता पोलीस खात्यातील पाटील नावाच्या माझ्या एका मित्राचा माझ्या मोबाइलवर फोन आला. 'लवकरात लवकर अंधेरी उपनगरात पोहोच, बाकी बातमी तुला तिथेच कळेल.' मी इतर मीडियावाल्यांना न सांगताच, माझ्या कॅमेरा युनिटला तिथेच सोडून काढता पाय घेतला. मुंबईच्या भाषेत याला 'कल्टी मारणे' म्हणतात. ऑफिसला फोन करून मी अंधेरी उपनगरात एक कॅमेरा युनिट पाठवायला सांगितले. चर्चगेटला जाऊन लोकल पकडली. सुमारे २० किमीचे हे अंतर ट्रेनने अर्ध्या तासात कापले. त्या अर्ध्या तासाच्या प्रवासात माझ्या मनात एकच प्रश्न घोळत होता, 'काय बातमी असेल? खरंच एखादी मोठी बातमी असेल का? की मी एखाद्या फालतू बातमीच्या मागे धावतोय? इथे काहीच बातमी मिळणार नाही आणि जी बातमी सोडून आलो, तीही हातची जायची, असं तर होणार नाही?' आयुष्यात आधीही अनेकदा 'दोन्ही घरचा पाहुणा उपाशी' अशी स्थिती झाली होती. 'पुन्हा तसंच तर होणार नाही ना?' ही शंका राहूनराहून मला सतावत होती. पण अखेर मी ही जोखीम पत्करायचा निर्णय घेतला. उखळात डोके ठेवल्यावर मुसळाला काय घाबरायचे? असो, तर अशा अनेक शक्यता आणि शंका-कुशंका घेऊनच मी अंधेरी स्टेशनला पोहोचलो. स्टेशनच्या बाहेर माझा कॅमेरामन बाबा जोशी माझी वाटच पाहत होता. मी त्याला सांगितले, की एखादी मोठी बातमी मिळणार आहे. अंधेरी स्टेशनजवळ नेहमीप्रमाणे प्रचंड गर्दी होती. त्यामुळे आम्ही जवळ हायवेवर शांतपणे बसून पाटीलची वाट बघायचे ठरवले. गर्दीतून दोन किमी वाट

काढत आम्ही तिथे पोहोचलो. वेस्टर्न एक्स्प्रेस हायवे. तेवढ्यात बाबा जोशी म्हणाला, ''संजयभाई,'' बाबा मला नेहमी अशीच हाक मारायचा. ''संजयभाई, चला जोगेश्वरी साइडला जाऊ या. तिथे फ्लायओव्हरच्या खाली आरामात गाडीत बसून वाट पाहू या.'' माझी त्या गोष्टीला हरकत नव्हती. आम्ही हायवेहून उत्तरेकडे वळलो. दुपारचे बारा वाजले होते. फ्लायओव्हरच्या खाली आम्हाला पेंग येऊ लागली. तेवढ्यात फटाक्यांचा आवाज आला. पण जरा वेळाने वाटले, की हा बंदुकीच्या गोळ्यांचा आवाज तर नसेल? तेवढ्यात बाबा म्हणाला, ''संजयभाई, ती बघा क्राइम ब्रांच ऑफिसरची गाडी.''

पाहिले तर ती भट्टसाहेबांची गाडी होती. आम्ही जास्त विचार न करता फ्लायओव्हरच्या दुसऱ्या टोकाकडे जाऊ लागलो. आवाज आणखी वाढले. मग अचानक बंद झाले. दोनच मिनिटांत आम्ही पूल ओलांडला होता. हळूहळू काही ओळखीचे चेहरे दिसू लागले. आणखी २०० मीटर पुढे गेल्यावर क्राइम ब्रांचच्या प्रदीप शर्मांचे युनिट दिसू लागले. युनिटचे प्रमुख सीनिअर इन्स्पेक्टर प्रदीप शर्मा (मोठ्या गुन्हेगारांना मारून एन्काउन्टर्सची शंभरी केलेले प्रदीप शर्मा २००८ मध्ये लखन भैया बनावट चकमकीबाबत तुरुंगात देखील गेले होते. बराच काळ बाहेर राहिल्यावर ते पुन्हा पोलीस सेवेत रुजू झाले आणि त्यांनी दाऊद इब्राहीमच्या भावाला – इक्बाल कासकरला – अटक केली. नंतर शर्मांनी शिवसेनेच्या तिकिटावर आमदारकीची निवडणूकही लढवली.) आपल्या हातातली एके - ४७ फिरवताना दिसले. त्यांनी बुलेटप्रूफ जाकीट घातले होते. थोड्या वेळाने त्यांचे साथीदार दया नायकदेखील आपले गुरू शर्मा यांच्याच थाटात दिसले. दोघांनी मिळून ८० पेक्षाही जास्त गुंडांना एन्काउन्टरमध्ये यमसदनाला धाडले होते.

तेवढ्यात दया नायकांनी मला फोन केला– ''लष्करचा दक्षिणी कमांडर अबू सुलतान आणि त्याच्या दोन साथीदारांना एन्काउंटरमध्ये मारून टाकलं. दोन पाकिस्तानी होते आणि तिसरा काश्मिरी होता.''

मी दयाला विचारले, ''मग बातमी फ्लॅश करू?''

दया म्हणाला, ''बिनधास्त करून टाक, सगळ्यात आधी तुलाच सांगितले आहे.''

इतर पत्रकारांनाही दया असेच काहीसे सांगणार हे मी जाणून होतो. मी

त्याला म्हटले, की मी तिथेच जवळपास आहे आणि तो मला दिसतो आहे. मी बाबा कॅमेरामनला सांगितले की शॉट्स घ्यायला लाग. बाबा कॅमेरा सुरू करून फोटो घेऊ लागला. दयाजवळ जाईपर्यंत मला तीन मृतदेह दिसले. मी ताबडतोब दिल्ली ऑफिसला फोन केला. त्यांनी ब्रेकिंग न्यूज घ्यायला सांगितली. सर्वप्रथम फोनो (फोनवर बातमी) दिला. तेवढ्यात सहारा न्यूजचा ब्यूरो चीफ मंदार परब आणि झी न्यूजचा केल्विन जोस्वा तिथे आलेले मला दिसले. मी प्रदीप शर्मा, दया नायक, यांच्या मुलाखती आणि सुरुवातीचे फोटो घेऊन पहिली टेप अपलिंक करण्यासाठी ड्रायव्हरबरोबर ऑफिसला पाठवली. (अपलिंक म्हणजे बातमीचे फोटो सॅटेलाइटद्वारे दिल्लीला पाठवायचे.) आमचे हेड ऑफिस दिल्लीला होते. मी, मंदार आणि केल्विन तिघेही न्यूज ब्रेक करण्याचा, म्हणजे सर्वांत आधी बातमी देण्याचा दावा करत होतो.

इलेक्ट्रॉनिक पत्रकारितेच्या दुनियेत 'न्यूज ब्रेक' ही थोडा आनंद मिळवून देणारी, पत्रकारांची न सुटणारी सवय आहे. याला 'ब्रेकिंग न्यूज कन्सेप्ट' म्हणतात. केवळ काही मिनिटांचे अंतर असते, पण प्रत्येक जण असे सांगत असतो की आपणच ती बातमी सर्वांत आधी दिली आहे. आणि होते असे, की प्रेक्षक त्या वेळी जे टीव्ही चॅनेल लावेल, त्याला त्याच चॅनेलने सर्वप्रथम बातमी दिली आहे असे वाटते. मात्र एनकाउन्टरबद्दल बोलायचे झाले, तर मुंबई पोलिसांचा गेल्या काही वर्षांतील हा सर्वांत मोठा एनकाउन्टर होता. प्रदीप शर्मा आणि त्यांचे साथीदार छाती पुढे काढून वावरण्यात कसूर करत नव्हते. मला सबइन्स्पेक्टर सचिन वाझे दिसले. बॉम्बस्फोटातील एक आरोपी संशयास्पदरीत्या गायब झाल्याच्या बाबतीत (आरोपी ख्वाजा युनुसच्या आईवडिलांचा असा आरोप होता, की ख्वाजा युनुसचा मृत्यू पोलिसांनी केलेल्या छळामुळे झाला आणि नंतर पोलिसांनी त्याच्या प्रेताची विल्हेवाट लावली.) सचिन वाझे यांना निलंबित केले होते. एका हातात रिवॉल्व्हर आणि दुसऱ्या हातात नोकिया कम्युनिकेटर फोन घेऊन ते माझ्याजवळ आले. ''संजय, माझं शूट घेऊ नकोस.'' मला माहीत होते की निलंबित होऊनसुद्धा त्यांचे तिथे असणे त्यांच्यासाठी अडचणीचे ठरू शकते. मी कॅमेरामनला सांगितले की सचिन वाझेंचे फोटो घेऊ नकोस. माझे काय जात होते! वास्तविक सचिन वाझेच्या निलंबनाच्या बाबतीत सर्वांत जास्त आरडाओरड मीच केली होती. पण थोड्या वेळाने ते पुन्हा माझ्याजवळ येऊन म्हणाले,

"संजय, घे माझे फोटो बिनधास्त." मला वाटते तोपर्यंत त्यांनी त्यांचे बॉस प्रदीप शर्मा यांची परवानगी घेतली असावी. मी कॅमेरामनला खूण केली. सचिन वाझे एका दहशतवाद्याच्या मृतदेहाजवळ जाऊन त्याची तपासणी करण्याचा अभिनय करू लागले. परत येऊन त्यांनी मला सांगितले, "माझे फोटो अगदी मोकळेपणाने वापर." एनकाउन्टर होऊन ३०-४० मिनिटे झाली होती. इतर मीडियावाले तिथे येऊन पोचले होते. थोड्या वेळात जॉइंट कमिशनर (क्राईम) सत्यपाल सिंह आणि अतिरिक्त कमिशनर राकेश मारिया तिथे आले. मग सत्यपाल सिंह यांची मुलाखत घेतली गेली. राकेश मारियांच्या चेहऱ्यावर आश्चर्य स्पष्ट दिसत होते. त्यांना आश्चर्य या गोष्टीचे वाटत होते, की त्यांच्या आधी इतके सगळे मीडियावाले इतक्या लवकर तिथे कसे पोहचले? हाच प्रश्न राकेश मारियांनी मंदारला विचारलेला मी ऐकला. पण विजयोत्सवाच्या प्रसंगी अशा गोष्टी जास्त वेळ टिकत नाहीत. संध्याकाळी चार वाजता मुंबईचे पोलीस कमिशनर आर.एस. शर्मांनी या बाबतीत एक पत्रकार परिषद बोलावली आहे, असे मला समजले. गेले चार महिने बॉम्बस्फोटाच्या दुर्घटनेमुळे हादरलेल्या मुंबई पोलिसांसाठी हे मोठेच यश होते. कमिशनर ऑफिसकडून आणखी माहिती मिळण्याची आशा होती. माझे काम पूर्ण झाले होते. दुपारी दीड वाजता मी तिथून निघालो. विचार केला, लवकरात लवकर बातमी एडिट करून पत्रकार परिषदेला जावे, कारण कमिशनर ऑफिस माझ्या ऑफिसपासून अर्ध्या तासाच्या अंतरावर होते. परत येताना संपूर्ण प्रवासात माझा मोबाइल फोन दिल्ली ऑफिसच्या बॉसेसची प्रशंसा स्वीकारण्यात व्यग्र होता.

## ✍ तपासाच्या रिपोर्टची प्राप्ती

मिळालेल्या बातमीची माझी स्क्रिप्ट एव्हाना लिहून झाली होती आणि एडिटिंग करायला घेणार, तेवढ्यात ऑफिसच्या फोनवर माझ्या एका खास 'सूत्राचा' फोन आला. त्याने फार काही सांगितले नाही. तो पुन:पुन्हा हेच सांगत होता, "ताबडतोब मला भेट. माझ्याकडे एक मोठी बातमी आहे." मी त्याला टाळण्याचा बराच प्रयत्न केला कारण मला वाटत होते की माझ्याकडे जी बातमी आहे त्यापेक्षा त्याच्याकडे कोणती अशी मोठी बातमी

असणार? मी कोणती बातमी टाळत होतो, याची मला कल्पनाच नव्हती. माझ्या स्वप्नात देखील नव्हते की ती बातमी माझ्या पत्रकारितेच्या आयुष्यातला टर्निंग पॉइंट ठरणार आहे. माझा तो सूत्र सतत आग्रह करत होता. मी त्याचे म्हणणे मानावे म्हणून त्याने मला आमच्या मैत्रीची शपथ घातली. तेव्हा कुठे मी त्याला भेटायला कबूल झालो. मी फक्त माझ्या कॅमेरामनला कमिशनरच्या पत्रकार परिषदेत पाठवले आणि ऑफिसमध्ये कोणालाही न सांगता त्या सूत्राने सांगितलेल्या पत्त्यावर त्याला भेटायला निघालो. पत्रकारितेत 'सूत्र' हा शब्द अत्यंत महत्त्वाचा आहे. सूत्र म्हणजे असा माणूस, जो बातमी देतो. सामान्य भाषेत त्याला 'खबऱ्या' म्हणता येईल. कोणत्याही सरकारी विभागात, खासगी कंपनीत किंवा पोलिसांत वगैरे, हा माणूस विभीषणाची भूमिका निभावतो. अशी सूत्रे निर्माण करणे हे प्रत्येक पत्रकारासाठी आवश्यक असतेच, पण त्याहीपेक्षा आवश्यक असते ते त्या सूत्राची ओळख गुप्त ठेवणे. आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे कित्येकदा बातमी फारशी महत्त्वाची नसली, तरी सूत्राला खूश ठेवण्यासाठी आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी, मनात नसले तरी भेटून ती बातमी कव्हर करावी लागते. पत्रकारितेचा आब राखण्यासाठी पुस्तकात मी त्या सूत्राची ओळख जाहीर करू इच्छित नाही, त्यामुळे पुस्तकात त्याचा उल्लेख 'सूत्र' असाच होईल. तर, मला त्या दिवशी त्या सूत्राला मुळीच भेटायचे नव्हते. माझ्या मनाची तशी तयारीच नव्हती, तरीही चडफडत त्याला भेटायला गेलो. त्याने मला एक मोठे पाकीट दिले. मी उघडून पहिले, तर त्यात स्पायरल बाइंडिंग केलेला एक रिपोर्ट होता. सुमारे शंभर पानांचा तो रिपोर्ट होता.

त्याच्या वरच्या पानावर लिहिले होते, 'कॉन्फिडेंशियल', म्हणजे गोपनीय. त्या नंतरच्या पानावर लिहिले होते, 'स्पेशल इन्वेस्टिगेटिव्ह टीम रिपोर्ट.' तो रिपोर्ट तेलगी घोटाळ्याबद्दलचा होता आणि तो डीजीआय सुबोध जयस्वाल यांनी तयार केला होता. माझा विश्वास बसावा म्हणून माझ्या त्या सूत्राने त्याची मूळ प्रत देखील मला दाखवली. त्याला माझा संशयी स्वभाव चांगला माहीत होता. मी रिपोर्ट बॅगेत ठेवला आणि त्या सूत्राला म्हटले, ''निघतो मी.'' तो माझ्या निरुत्साही वागण्याने चक्रावला होता. म्हणाला, ''संजयजी, तुम्ही कुठल्या गोष्टीला इतकी किरकोळ समजताय, याची तुम्हाला कल्पना नाही, कदाचित तुम्ही गडबडीत आहात किंवा तुमच्या डोक्यात ती

एनकाउन्टरचीच बातमी घोळते आहे, म्हणून या बातमीकडे तुमचे नीट लक्ष नाही आहे. पण प्लीज, तुम्ही नंतर हे निवांतपणे वाचा. माझे उपकार आयुष्यभर स्मराल.'' मी त्याच्याकडे बघून हसलो, आणि मनातल्या मनात त्याला एक वाईट शिवी हासडली. पण चेहरा जबरदस्तीने हसरा ठेवून त्याचा निरोप घेतला. मनात म्हटले, त्याला उगीच कशाला नाराज करू? त्याला बरे वाटावे म्हणून मी त्याला सांगितले, ''हो, हो, नक्की वाचेन.'' वास्तविक, असले रिपोर्ट घेऊन लोक नेहमीच माझ्याकडे येत असतात. मला हे कागदही तसेच बिनकामाचे वाटले होते.

माझ्या मनात काय चालले आहे, हे कदाचित माझ्या सूत्राने ताडले असावे. तो बऱ्याच वर्षांपासून मला ओळखत होता. माझ्याकडे बघून तो सूचक हसला. जणू म्हणत होता, 'बेटा, तुला कल्पना नाही, तुझ्या हाती काय घबाड लागलं आहे.' पण मला त्या दिवशी इतर काहीच सुचत नव्हते. दिवसभर मी एनकाउन्टरच्या मोठ्या बातमीच्या प्रौढीत मग्न होतो. त्यापुढे बाकी सगळ्या बातम्या मला क्षुल्लक वाटत होत्या. त्याला भेटून परत आल्यावर मी माझी एनकाउन्टरची स्टोरी एडिट केली. सात वाजताच्या बुलेटिनसाठी ती 'हेडलाईन' म्हणून गेली देखील. अख्खे मुंबई ऑफिस माझ्या रिपोर्टिंगची तारीफ करत होते. त्या दिवशी छाती आणखी दोन इंच रुंद झाली होती. (पण ५६ इंच मात्र झाली नव्हती.) मी पावणेआठ वाजता ऑफिसमधून निघालो. स्टार न्यूजसाठी माझे ते शेवटचे रिपोर्टिंग होते आणि ते मोठे दिमाखात पार पडले होते. त्यामुळे मी अगदी संतुष्ट होतो. मी काही मित्रांना भेटून रात्री उशिरा घरी पोहोचलो. सूत्राने दिलेला तो रिपोर्ट माझ्या बॅगेत अजूनही तसाच पडून होता.

## ✍ ३० मार्च २००३ : रविवार : रिपोर्टचे महत्त्व

ती एक आळसावलेली सकाळ होती. रात्रभर मला गाढ झोप लागली होती. पुढचे दोन आठवडे ना स्टोरी फाईल करायचे टेन्शन होते, ना डेडलाईनची भानगड. ('डेडलाईन' म्हणजे ठरावीक वेळेत बातमी देणे.) याचे कारण म्हणजे आम्ही 'ऑफ एअर' झालो होतो. १४ एप्रिलपासून आमचे एनडीटीव्हीचे स्वत:चे चॅनेल सुरू होणार होते. तोपर्यंत आराम होता, पण कुठेतरी वाटत

होते की आधीच्या स्टार न्यूज चॅनेलसाठी केलेली शेवटची स्टोरी जशी धमाकेदार होती, तशीच एनडीटीव्ही चॅनेलची सुरुवातसुद्धा धूमधडाक्यात झाली पाहिजे. त्यासाठी अशी एखादी बातमी मिळवायला पाहिजे, जी या चॅनेलची सुरुवात धूमधडाक्यात करेल. पुन्हा एकदा नशिबाने माझ्या बाजूने कौल दिला. बहुचर्चित भरत शाह केसमध्ये पुरावे म्हणून तयार केलेल्या १६ ऑडिओ टेप्स मला मिळाल्या. भरत शाह केस अंडरवर्ल्ड आणि बॉलिवूडचे संबंध उघड करणारी होती. गुन्हेगार जगतातील ग्लॅमर आणि ग्लॅमर जगतातील गुन्हेगारी, यावर प्रकाश टाकणारी होती. त्या टेप्सच्या रूपाने मला चांगलाच चटपटीत मसाला मिळाला. माझ्या मनात आले, या टेप्समधून निश्चितच कितीतरी सनसनाटी बातम्या निघतील, कारण त्या सगळ्या टेप्स एक्स्क्लूसिव्ह होत्या.

पत्रकारितेच्या दुनियेत 'एक्स्क्लूजिव' शब्दाला खास महत्त्व आहे – म्हणजे मीडियामध्ये चर्चा, बॉसकडून शाबासकी वगैरे. वास्तविक 'एक्स्क्लूजिव' शब्दाचा अर्थ आहे – अमुक एक बातमी फक्त तुमच्याकडेच आहे, इतर कोणाकडेही नाही. बातमी मोठी आणि सनसनाटी देखील पाहिजे, जी प्रसिद्ध केल्यामुळे वर्तमानपत्राला जास्त वाचक आणि टीव्हीला जास्त प्रेक्षक मिळतील. आता, 'एक्स्क्लूजिव' शब्दाचा अर्थ गेल्या काही वर्षांत बदलून गेला आहे ही गोष्ट वेगळी. ती एकच बातमी एकाच वेळी अनेक चॅनेल्सवर दाखवली जाते, पण काही जण तिला 'एक्स्क्लूजिव' लेबल लावून विकतात. एकाच प्रसिद्ध व्यक्तीच्या वेगवेगळ्या मुलाखती घेतल्या जातात पण प्रत्येक चॅनेलवर ती 'एक्स्क्लूजिव' म्हणून दाखवली जाते. हे रिपोर्टरच्या चुकीमुळे होते की संपादकाच्या, कोणास ठाऊक! पण प्रेक्षकांना 'आपण फसवले जातोय' याची जाणीव नक्की होते. मला तरी वाटते की एक दिवस असाही उजाडेल, जेव्हा राजकीय पक्षातील नुसत्या बसून राहणाऱ्या प्रवक्त्यांची टिप्पणी आणि एखाद्या नवीन प्रॉडक्टचे लॉन्चसुद्धा 'एक्स्क्लूजिव' असा शिक्का मारून दाखवले जाईल आणि त्याचे श्रेयदेखील घेतले जाईल. 'एक्स्क्लूजिव' ची पुढची पायरी म्हणजे 'हाइप'. म्हणजे बातम्यांना तिखटमीठ लावून आणि कधीकधी तर अतिशयोक्ती करून दाखवणे, म्हणजेच एखादी किरकोळ बातमी फुगवून मोठी करणे.

यामुळे महत्त्वाची बातमी आणि बिनमहत्त्वाची बातमी यातला फरकच

प्रेक्षकांसाठी नाहीसा होतो. एक वेळ हाइपच्या पापाला क्षमा करू शकतो, पण सर्वांत घातक प्रवृत्ती म्हणजे मुळात बातमीच नसताना बळेबळेच एखादी तथाकथित बातमी 'निर्माण' करणे. हे सगळे असेच चालू राहिले तर पुढच्या काळात टीव्ही पत्रकारिता आणि 'डब्ल्यू डब्ल्यू एफ'च्या आपापसातल्या कुस्त्यांचा प्रेक्षकवर्ग एकच असेल. असो. पुन्हा वळू या आपल्या मूळ कथानकाकडे. मी ज्या वकील मित्राकडून भरत शाह केसच्या टेप्स मिळवल्या होत्या, त्या त्याला परत करायच्या होत्या. मी कोऱ्या टेप्स विकत घेतल्या. रेकॉर्डिंग करण्यासाठी एका मित्राच्या घरी गेलो. त्याच्याकडे डबल रेकॉर्डर होता, ज्यावर एका टेपवरून दुसऱ्या टेपवर रेकॉर्डिंग करण्याची सोय होती. मी रेकॉर्डिंग करायला सुरुवात केली, तेवढ्यात त्या मित्राच्या घरी त्याचा एक नातलग आला. तो पोलीस अधिकारी होता. मीही त्याला ओळखत होतो आणि तो मला. या पोलीस अधिकाऱ्याचा उल्लेख मी पुढे 'वर्दीतला (गणवेशातला)मित्र' असा करेन कारण तो अधिकारी आजही मुंबई पोलिसांत काम करतो आणि त्याचे नाव उघड करणे त्याच्यासाठी हानिकारक ठरेल. हा माझा गणवेशातला मित्र पुढे माझ्या माध्यमांतील आयुष्यात आणि सगळ्या मोहिमांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका निभावणार होता. गणवेशातल्या मित्राला दुसऱ्याच्या कामात नाक खुपसण्याची आणि दुसऱ्याच्या वस्तूंना हात लावायची वाईट खोड होती. वास्तविक बरेच पोलीस या सवयीचे गुलाम असतात. प्रथम त्याने टेप्सबद्दल विचारले. मी त्याला सांगितले. त्याने त्यांत फारसा काही रस दाखवला नाही. त्यादरम्यान माझ्या बॅगमधून टेप्स काढताना मी जयस्वालचा रिपोर्ट काढून तिथे जवळच्या टेबलावर ठेवला. तोपर्यंत मला त्या रिपोर्टचे महत्त्व कळले नव्हते. गणवेशातला मित्र सवयीनुसार त्या रिपोर्टची पाने उलटू लागला. माझीही काही हरकत नव्हती, कारण अशा बाबतींत मला पोलिसांपेक्षा माझ्याच व्यवसायातील इतर पत्रकारांकडून अधिक धोका होता. मी रेकॉर्डिंग करण्यात व्यग्र होतो आणि माझा मित्र टीव्ही बघण्यात रमला होता. तीन-चार तास कसे उलटले कळलेच नाही. आम्ही कोणीच एकमेकांशी त्यादरम्यान बोललो नव्हतो. पण अचानक गणवेशातल्या मित्राने मौन तोडले. ''भैया,'' तो मला नेहमी भैय्या म्हणून हाक मारायचा. वास्तविक मुंबईत आलेल्या उत्तर प्रदेश, बिहारच्या लोकांना हे संबोधन आवडत नाही, तरीही लोक त्यांना तशीच हाक मारतात. पण मला त्याचे

काही वाटले नाही.

मी मान वर केल्यावर तो म्हणाला, ''भैया, हा रिपोर्ट खरा आहे का?''


''हो,'' मी उत्तरलो.

त्याने पुन्हा तोच प्रश्न विचारला, माझे पुन्हा तेच उत्तर. पुन्हा तोच प्रश्न, तेच उत्तर. तो चक्रावून म्हणाला, ''भैया, तुला कल्पना नाही , हे काय आहे! हा बॉम्ब आहे, बॉम्ब. यामुळे पोलिसांच्या प्रतिमेचे बारा वाजतील.'' मी पहिल्यांदाच त्याच्याकडे लक्ष दिले आणि मान वर केली. मला स्टोरीचा वास येऊ लागला. गणवेशातला मित्र बोलतच होता. ''अरे! यामुळे कमिशनर आर.एस. शर्मांची खुर्ची तर जाईलच पण बाकी पोलीस अधिकाऱ्यांनाही गाशा गुंडाळावा लागेल. तुला प्रसिद्धी मिळेल, सगळा भ्रष्टाचार उघड होईल. एकदम हार्ड हिटिंग रिपोर्ट आहे.'' मी त्याचे बोलणे लक्षपूर्वक ऐकत होतो. त्याने माझा चेहरा बघितला. पोलीसवाला असल्यामुळे त्याने माझ्या मनातला भाव ताडला. तो बोलता बोलता एकदम थांबला.

थोड्या वेळाने त्याने विचाले, ''तू हा रिपोर्ट वाचलास का?'' मी नकारार्थी मान हलवली. ''मूर्खा, एकदा वाच. याचं महत्त्व काय आहे याची तुला कल्पनाच नाही.'' तो उत्तेजित होऊन म्हणाला. या रिपोर्टबद्दल चोवीस तासांत मी दुसऱ्यांदा ऐकत होतो. काल माझा सूत्रदेखील मला हेच सांगत होता. मी त्याच्याकडून रिपोर्ट घेतला. इतका जाडजूड रिपोर्ट बघून मला तो वाचावासा वाटत नव्हता. पत्रकार नेहमी जे करतात, तेच मीही केले. ज्यात रिपोर्टचा सारांश आणि शिफारशी असतात, ती शेवटची चार पाने वाचली. काय स्टोरी आहे याचा मला अंदाज आला. पण इतकी महत्त्वपूर्ण आणि सनसनाटी असेल असे मला वाटले नव्हते. मी संपूर्ण रिपोर्ट वाचण्याचा निर्णय घेतला. हा तेलगी घोटाळ्याच्या तपासाचा रिपोर्ट होता. स्पेशल इन्वेस्टीगेशन टीमचे प्रमुख सुबोध जयस्वाल यांनी लिहिला होता.

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# ॥ गंधर्वगाथा ॥

**भा. द. खेर**

*बालगंधर्वांच्या कलाजीवनातील आणि लौकिक जीवनातील भावनाट्य टिपणारी कादंबरी*

### भावी भाग्याचा भास

पहाटेच्या पवित्र प्रहरी संगीताचे सूर कानी पडू लागले म्हणजे मला एकदम जाग यायची. माझे वडील चांगले सतारिया होते. पहाटेच्या प्रहरी त्यांच्या सतारीतून भक्तीचा गोड झंकार निघू लागायचा. त्या झंकाराला गायीगुरांच्या खुरांचा ताल मिळायचा! त्यांच्या हंबरण्याचा सूर मिळायचा. वातावरणात नुकतंच सुरू झालेलं पक्ष्यांचं कूजन त्या

झंकारात मिळून-मिसळून जायचं! पहाटेचं सारं वातावरण पावित्र्यानं नादमय होऊन जायचं.

त्याच वेळी हरिआत्याची हाक माझ्या कानी पडायची, ‘नारायणा उठतोस ना?’

हा नारायण त्या हाकेच्या आधीच उठून बसलेला असे. मुखमार्जन करून सतारीला आपल्या गोड गायनानं सुरेल साथ देत असे!

हरिआत्या लगोलग तिथे येऊन त्या पहाटेच्या संगीत मैफलीत येऊन बसत असे.

आपल्या भावाच्या सुरेल सतारवादनापेक्षा या हरिआत्याला आपल्या भाच्याच्या गायनाची अपूर्वाई वाटायची. तो सुरेल कार्यक्रम संपल्यानंतर म्हणायची, ‘‘श्रीपाद, किती रे नारायणाचा आवाज मधुर आहे! नुसता मध याच्या मुखातून स्त्रवतो आहे! देवाची रे बाबा ही देणगी! मुलाचे पाय पाळण्यात दिसतात, हेच खरं!’’

हरिआत्याच्या या बोलण्यात मला रोज देव दिसायचा.

हरिआत्या पुढे म्हणायची, ‘‘मी रोज उगाच त्याची दृष्ट काढत नाही! श्रीपादा, लोकांच्या नजरा मोठ्या वाईट असतात. चांगल्याचं केव्हाच वाईट होऊन जातं!’’

हरिआत्या रोज संध्याकाळी माझी दृष्ट काढायची. कुणी माझ्या गाण्याचं वर्णन केलं म्हणजे बाजूला नेऊन माझ्या कानशिलांवर बोटं मोडून अलाबला करायची.

आमच्या शाळेत कुणी पाहुणा आला म्हणजे त्याच्यासमोर माझं गाणं हटकून व्हायचं! त्या पाहुण्यानं मला काही बक्षिसी दिली म्हणजे घरी येऊन मी ती बक्षिसी प्रथम हरिआत्याला दाखवायचा. ती बघून तिला आनंद व्हायचा. परंतु मला दृष्ट पडेल अशी तिला धास्तीही वाटायची. लटक्या कृतक कोपानं उद्‌गारायची, ‘हात मेल्यांनो! उगाच फुकाचं वर्णन करू नका!’ असं म्हणून अलाबला करायची. या बाबतीत मी मात्र निर्विकार असे. त्याही लहान वयापासून मला देवाची सोबत असे. माझ्या पाठीशी देव असताना माझ्या आवाजाला कोण काय करणार आहे? देवानं दिलेलं कोण हिरावून नेणार आहे, हाच विचार सतत सोबत असे.

हे सारं संगीतमय वातावरण जळगावचं! माझं प्राथमिक शिक्षण नागठोण

इथे झालं. माझ्या वडिलांची नोकरी फिरतीची होती. ते ड्राफ्ट्समन होते; शिवाय त्यांचं ड्रॉइंगही चांगलं होतं. ते चांगले सतारिया असल्यामुळे त्यांच्याकडे अनेक विद्यार्थी सतार शिकायला येत. वडिलांची नोकरी फिरतीची असल्यामुळे त्यांनी मला जळगावला आबासाहेब म्हाळस यांच्याकडे शिक्षणासाठी ठेवलं.

आबासाहेब म्हाळस हे हरिआत्याचे जावई. म्हणजे माझ्या आत्तेबहिणीचे यजमान!

आबासाहेब म्हाळस हे जळगावातलं मोठं प्रस्थ होतं. ते तिथले नाणावलेले वकील होते. जळगावच्या सार्वजनिक चळवळींतही भाग घेत. ते जळगावच्या नगरपालिकेचे प्रेसिडेन्टही होते.

आबासाहेबांचं माझ्यावर निरतिशय प्रेम होतं. ते मला दत्तकच घेणार होते. पण माझ्या आईला ते मान्य नव्हतं.

जळगावच्या सरकारी शाळेत माझं शिक्षण चालू होतं. परंतु शिक्षणाकडे माझं फारसं लक्ष नव्हतं. माझा सारा ओढा संगीताकडे असे.

शाळेत कुणी पाहुणा आला म्हणजे त्याच्या सत्कारसभेत माझं गाणं हटकून व्हायचं. शाळेतील प्रत्येक समारंभात मला एखादं पद किंवा भजन म्हणावंच लागे.

आबासाहेब म्हळस हे गाण्याचे आणि नाटकाचे मोठे शौकीन होते. गावात एखादी नाटक कंपनी आली म्हणजे त्यांची त्या कंपनीच्या नाटकाला हजेरी असायची. त्यामुळे त्यांच्याबरोबर मी जळगावात येणारी अनेक नाटकं बघितली.

त्या वेळी जळगावच्या जोशी वकिलांचे जावई भास्करराव भावे यांचा तिथे मुक्काम होता. हे भास्करराव भावे म्हणजे पुढे प्रख्यात लेखक झालेले पु. भा. भावे यांचे वडील! त्यांच्यामुळे मी नाट्यकला प्रवर्तक आणि शाहूनगरवासी मंडळींची नाटकं बघितली. त्यामुळे माझं संगीतप्रेम वाढतच गेलं. माझा गाण्यातला हा कल पाहून मला गाणं शिकविण्यासाठी एक गुरू ठेवला. माझे गुरू मेहबूबखान हे जळगावला मोठे नावाजलेले गवई होते. ते जळगावच्या न्यायाधीशांच्या पत्नीला गाणं शिकवीत असत. आबासाहेबांचा या न्यायाधीशाशी चांगला संबंध होता. त्यांच्या शिफारशीमुळे मेहबूबखान यांनी मला शिकविण्याचं मान्य केलं. माझं संगीतशिक्षण पहाटे साडेपाच वाजता सुरू व्हायचं. त्या वेळी हरिआत्या जवळ बसून माझी गाण्याची तालीम लक्षपूर्वक

ऐकायची. जळगावात त्या वेळी 'हपशा' या नावाची एक मुसलमान गायिका होती. तिच्याकडे मी अधूनमधून गुरुजींबरोबर जात असे. त्या ठिकाणी हपशाबाई मला आग्रहानं गायला सांगायची. त्या बाई म्हणत, 'अशीच गाण्याची तालीम चालू ठेव. तुझा आवाज फारच गोड आहे. या कलेच्या जोरावर तुला कुणाची चाकरी करायची गरज पडणार नाही.'

जेव्हा जेव्हा आमच्या घरी गोडधोड होत असे, तेव्हा आत्या ते मला गुरुजींकडे न्यायला सांगत असे.

ते बघून गुरुजी म्हणायचे, ''नारायण, क्या लाया है? मेरे गोदमे तूही बैठ जा, मेरे साथ तूही खा ले,'' असं म्हणून आपल्या हातानं मला ते खाऊ घालत असत.

कलेपुढे जातपात मुळीच नसते, हे बालकडू मला अगदी लहानपणापासून मिळालेलं होतं.

या काळात माझी जळगाव, मालेगाव, पुणे अशी त्रिस्थळी यात्रा चालू होती. जळगावचा मुक्काम उठला तेव्हा माझं गाणं काही दिवस बंद पडलं होतं.

त्यानंतर काही दिवसांनी मी पुण्याला आलो होतो. त्या वेळी बाबा तारहाबादकर या नावाचे महीपतीच्या घराण्यातील एक गवई माझ्या वाड्याजवळ राहत असत. माझा आवाज तेव्हा बराच सुधारलेला होता.

एक दिवस बाबासाहेबांनी माझं गाणं ऐकलं. त्यांना माझं गाणं फार आवडलं.

बाबासाहेब हे उत्तम कीर्तनकार होते. ते मला काही पदं शिकवीत. त्यामुळे त्यांच्या घराण्यातील 'बालगायक' म्हणून माझी कीर्ती झाली.

मध्यंतरी मला कुत्रा चावला. म्हणून मी आईचे वडील अप्पाशास्त्री बेलेकरांकडे पुण्याला गेलो. मला कुत्रा चावल्याची बातमी माझ्या या आजोबांचे यजमान बाबा महाराज यांच्या कानांवर गेली. त्यांना माझ्याविषयी फार प्रेम होतं. ते मला कोल्हापूरला घेऊन गेले आणि माझ्यावर डॉक्टरी उपचार सुरू केले. त्याच मुक्कामात तिथल्या सुप्रसिद्ध अपय्याबुवांची गाण्याची शिकवणी सुरू केली.

एक दिवस बाबा महाराज शाहूमहाराजांना भेटले. त्या वेळी त्यांना म्हणाले, ''माझ्या पुरोहितांचा नातू नारायण राजहंस हा सध्या इथे माझ्याकडे आहे. लोकमान्य टिळकांनी त्याला 'बालगंधर्व' ही पदवी दिली होती.''

शाहू महाराज लगेच उद्गारले, ''मग त्याला माझ्याकडे घेऊन या की!

मला त्याचं गाणं ऐकायचंय!''

त्यांनी म्हटल्याप्रमाणे एक दिवस शाहू महाराजांसमोर माझं गाणं झालं. ते गाणं त्यांना भारी आवडलं.

शाहू महाराज हे स्वत: रसिक तर होतेच, पण फार गुणग्राहकही होते. अल्लादिया खां यांच्यासारखे अखिल भारतीय कीर्तीचे गायक त्यांच्या दरबारात होते. त्यांना माझं गाणं अतिशय आवडलं. तेव्हापासून मी त्यांच्याकडे वारंवार जाऊ लागलो.

एके दिवशी महाराजांशी बोलताना एक गोष्ट त्यांच्या ध्यानात आली. मला नीट ऐकू येत नाही, हे त्यांना समजलं. तेव्हा त्यांनी लगेच डॉक्टर गाडगीळ यांना बोलावून घेतलं आणि म्हटलं, 'या नारायणाला मिरजेच्या हॉस्पिटलमध्ये घेऊन जा. त्याच्या कानांवर उपचार करायला हवेत!'

त्या वेळी नेमका 'किर्लोस्कर संगीत मंडळी'चा मिरजेत मुक्काम होता. त्या कंपनीबद्दल शाहू महाराजांना विशेष आपुलकी होती. 'ही माझीच कंपनी आहे,' असं ते म्हणत. भाऊराव कोल्हटकरांच्या निधनानंतर त्या कंपनीला फार वाईट दिवस आले होते. त्या वेळी महाराजांनी 'किर्लोस्कर कंपनी' ला चांगल्यापैकी आर्थिक साहाय्य केलं होतं.

डॉ. गाडगीळ यांच्याबरोबर मला मिरजेला पाठवताना शाहू महाराज यांना आठवण झाली ती किर्लोस्कर मंडळींची! शाहू महाराज त्यांना म्हणाले, ''डॉक्टर, नारायणाच्या कानाचं ऑपरेशन झालं, की त्याला किर्लोस्कर मंडळींच्या बिऱ्हाडी घेऊन जा. शंकरराव मुजुमदारांना सांगा, की माझी इच्छा आहे, की या मुलानं किर्लोस्कर मंडळीत राहिलं पाहिजे. हा मुलगा भाऊराव कोल्हटकरांचं नाव काढील!''

त्या वेळी किर्लोस्कर मंडळींचं नाव मला चांगलं परिचित होतं. महाराजांचे ते उद्गार ऐकून माझं भाग्य घरी चालून येत आहे, असा स्पष्ट भास मला झाला!

## नावात काय आहे?

आमच्या जळगावच्या शाळेतील पुस्तकात एक धडा होता. त्या धड्याचं नाव होतं, 'गोखल्यांचे रास्ते कसे बनले?' तो नामांतराच्या इतिहासाचा

धडा होता.

मग आम्हा मुलांचा तो एक खेळच बनला होता. मधल्या सुट्टीत किंवा सवडीच्या वेळी मुलं एकत्र जमली म्हणजे तशा प्रकारच्या नामांतराच्या भेंड्या लावल्या जायच्या.

कोंढाण्याचा 'सिंहगड' कसा झाला अशासारख्या इतिहासाचे दाखले मग पुढे येत. त्यानंतर ब्रिटिशांच्या कारकिर्दीत नावांची झालेली ससेहोलपट पुढे यायची. खडकीचं 'किरकी' किंवा कोलकोत्याचं 'कलकत्ता' अथवा मुंबईचं 'बॉम्बे', पुण्याचं 'पूना' ही नावं कशी रूढ झाली याची जंत्रीच्या जंत्री वाचली जायची.

ती यादी वाचली जात असताना मला माझ्या 'राजहंस' या आडनावाचा अभिमान वाटायला लागायचा.

तोच कुणीतरी कुचेष्टेनं म्हणावं, 'ही झाली नावं बदलण्याची गोष्ट! पण आपल्याकडे काही आडनावं पोत्यावारी असतात त्याचं काय?'

कुणीतरी विचारावं, 'कोणती रे?'

'देशपांडे, कुलकर्णी. त्यांच्या वंशवृक्षावर दगड मारला तर किती तरी देशपांडे आणि कुलकर्णी पटापट खाली पडतील!'

मी हायसं होऊन मनाशी म्हटलं, 'नशीब! आपलं देशपांडे किंवा कुलकर्णी हे नाव नाही. नाहीतर त्या गर्दीत आपण गवसणार नाही. हरवून जाऊ!'

मध्यंतरी काही काळ लोटला; आणि कालमार्गावरून चालताना मध्येच एखादा खड्डा लागून शरीराला हिसका बसावा, तसा माझ्या मनालाच हिसका बसला!

आमचं मूळचं नाव नेमकं देशपांडे हेच निघालं. खडा मारला तर... आमच्या नावाचा सारा इतिहास मला समजला!

आम्ही मूळचे देशपांडे. दक्षिण साताऱ्यातील नागठाणे हे आमचं गाव! हे गाव औदुंबर या तीर्थक्षेत्रापासून तीन मैलांवर आहे. त्या गावात माझे पणजोबा नारायणराव हे सुखवस्तू शेतकरी होते. माझ्या जन्माच्या वेळी गावातील शेतजमिनीची व्यवस्था माझे चुलते वामनराव हे बघत असत. माझे आजोबा कृष्णाजीपंत हे त्या वेळी विकलांग अवस्थेत होते.

आम्ही मूळचे देशपांडे हे राजहंस कसे झालो, याची एक मोठी मनोरंजक

कथा आहे. फार वर्षांपूर्वी आंबेजोगाई येथून देशपांडे नावाचे आमचे एक पूर्वज ग्वाल्हेर दरबारी गेले. तिथे त्यांनी आपल्या कर्तृत्वावर मोठी मानाची जागा मिळवली. ते मोठे गणपती भक्त होते.

त्यांच्या या मानसन्मानाचा त्यांच्या हितशत्रूंना हेवा वाटू लागला. त्या मंडळींनी त्यांच्या विरुद्ध एक कुभांड रचलं; आणि दुर्दैवानं राजेसाहेबांना त्यात तथ्य दिसलं. एवढ्यावरून राजेसाहेब थांबले नाहीत. त्या कुंभाडातील सत्य पडताळून पाहण्याची फारशी तसदीही त्यांनी घेतली नाही. राजेसाहेबांनी देशपांड्यांना बंदिवासात टाकलं.

या प्रकारामुळे त्यांच्या मातु:श्रींना मोठा धक्का बसला. गणपतीवरील त्यांच्या श्रद्धेला तडा गेला. तिनं पूजेतील गणपतीची मूर्ती घोड्यांच्या पागेत नेली. क्रोधवश होऊन म्हणाली, ''मला माझ्या मुलाबद्दल पूर्ण खात्री आहे. तो धुतल्या तांदळासारखा स्वच्छ आहे. तो कोणतंही अपकृत्य करणार नाही.''

एवढं बोलून ती पुढे पुटपुटली, 'माझ्या मुलावर अन्यायानं झालेल्या आरोपाचं निरसन होऊन तो मुक्त झाला पाहिजे. तोपर्यंत तुझी इथून मुक्तता होणार नाही.' असं म्हणून त्या माउलीनं गणेशाची ती मूर्ती त्या पागेत पुरून टाकली.

त्यानंतर आठ दिवसांतच एक दैवी चमत्कार झाला. ज्या बंदिखान्यात आमच्या पूर्वजांना ठेवलं होतं, त्या बंदिखान्याचे दरवाजे एकाएकी उघडले आणि देशपांडे बंदीतून मुक्त झाले.

बंदिखान्यातून मुक्त झाल्यानंतर कुणालाही न सांगता सवरता ते एकदम दक्षिणेत अवतरले!

हे वृत्त कळल्यानंतर राजेसाहेबांना त्याच रात्री दृष्टान्त झाला. या गुन्ह्यातला खरा गुन्हेगार कोण आहे, हे त्यांना समजलं. देशपांडे निर्दोष आहेत या गोष्टीची खात्री पटली. त्यांनी लगेच त्यांचा शोध घेऊन त्यांना सन्मानानं दरबारी परत आणलं. त्यांचा मोठा सत्कार केला.

सत्काराच्या भाषणात राजेसाहेब म्हणाले, ''देशपांडे या पुण्यवान पुरुषानं गणपतीच्या कृपेमुळे 'राजहंसा'प्रमाणे तुरुंगातून भरारी मारली. ते या क्षणापासून देशपांडे राहिले नाहीत; ते आता 'राजहंस' झाले आहेत.''

त्या दिवसापासून आम्ही साऱ्या जगाचे 'राजहंस' बनलो.

परंतु माझे चुलत चुलते यांनी मात्र 'राजहंस' हे नाव स्वीकारलं नाही.

कारण त्यांना आपलं नागठाणे येथील कुलकर्णीपणाचं वतन सांभाळायचं होतं.

कालांतरानं माझ्या नावाची ख्याती महाराष्ट्रभर पसरली. त्या वेळी नागठाणे येथील लक्ष्मीनागेश्वर मंदिराच्या पायऱ्यांचा जीर्णोद्धार माझ्या हस्ते झाला. तेव्हा त्या मंदिराच्या पायऱ्यावर 'श्रीपादराव कुलकर्णी ऊर्फ राजहंस' असे शब्द कोरले होते.

माझे वडील श्रीपादराव हे मिलिटरी इंजिनिअरिंगमध्ये ड्राफ्ट्समन म्हणून नोकरी करीत होते. पण ते उत्तम चित्रकार आणि चांगले सतारियेही होते हे मी आधी सांगितलंच आहे. माझे दोन्ही मामा नाटक कंपनीत होते. त्यांतले मोठे वासुदेवराव मामा हे 'नाट्यकला प्रवर्तक मंडळी'च्या संस्थापकांपैकी एक होते. अशा या संगीत आणि नाटक यांची परंपरा असलेल्या घराण्यात पुण्याला २६ जून १८८६ या दिवशी सकाळी ६ वाजून २ मिनिटांनी माझा जन्म झाला. त्या वेळी आम्ही शुक्रवार पेठेतील कान्हेरे वाड्यात राहत होतो.

## मी बालगंधर्व केव्हा झालो?

विख्यात आंग्ल नाटककार म्हणतो, नावात काय आहे?

मी म्हणतो, ''नावात सर्व काही आहे. काय नाही नावात?''

आमच्याच नावाच्या बाबतीत पाहा ना! माझं नाव नारायण; परंतु मी झालो बालगंधर्व. ज्यांनी मला हे नाव दिलं ते होते केशव! परंतु ते झाले बाळ- म्हणजेच बाळ गंगाधर टिळक. टिळकांच्या मातेनं त्यांना बाळ बनवलं! तर माझ्या त्या माउलीनं-बाळ गंगाधर टिळकांनी मला 'बालगंधर्व' ही पदवी दिली.

'बालगंधर्व' ही बहुमानाची पदवी त्यांनी मला लहानपणी दिली तो सारा प्रसंग मला आजही आठवतो. तो प्रसंग मला मोठेपणीही कधी विसरता आला नाही.

१८९८ सालातील डिसेंबर महिन्यातील तो सोनियाचा दिवस! मला दहावं वर्षं लागलं होतं. पुण्यातील शाळेत मी शिकत होतो. माझे आजोबा वेदशास्त्रसंपन्न अप्पाशास्त्री बेलेकर! हे पुराणिक म्हणून बाबा महाराजांच्या आश्रयाला होते. बाबा महाराजांची त्यांच्यावर विशेष कृपादृष्टी होती. त्यामुळे

आम्हा नातवंडांचं बाबा महाराजांच्या वाड्यावर नेहमी जाणं-येणं असायचं. लोकमान्य टिळक आणि बाबा महाराज यांचा स्नेहसंबंध सर्वश्रुत आहे. दत्तकाच्या संदर्भात टिळकांनी त्यांना अतिशय मदत केली होती. त्यामुळे बाबा महाराज हे त्यांना एक उपकारकर्ते म्हणून अतिशय मान देत असत. या स्नेहसंबंधांमुळे लोकमान्य टिळकांचं बाबा महाराजांच्या वाड्यावर नेहमी जाणं-येणं होत असे. लोकमान्य मला वाड्यावर नेहमी बघत असत. मला बघून म्हणत असत, 'हा आपल्या अप्पाशास्त्रींच्या कृष्णाबाईचा मुलगा!'

त्या वेळी शिकत असताना माझा गाण्याचा नादही चालू होता. वाड्यातील कारभारी यशवंतराव कुलकर्णी हे माझे चुलते असल्यामुळे मी त्यांच्याकडे नेहमी जात असे. तिथली मंडळी माझ्याकडून चीजा, पदं, गाणी म्हणवून घेत असत. लोकमान्यांच्या समोर माझं गाणं व्हावं, अशी इच्छा त्यांच्या मनात एकदा निर्माण झाली.

ती इच्छा त्यांनी लगेच अमलातही आणली.

त्या वेळी पुण्यात प्लेगची साथ सुरू होती. सारं पुणं गावाबाहेर पडलं होतं. माझाही मुक्काम गावाबाहेरच होता. त्या ठिकाणी त्यांनी माझा कार्यक्रम करण्याचं ठरवलं.

जेव्हा ते मला कळलं तेव्हा मी अक्षरश: हरखून गेलो. माझं वय ते काय आणि गानतपश्चर्या ती कोणती! आता या महापुरुषासमोर गाणं होणार म्हणजे माझ्यावर कोणता प्रसंग ओढवणार होता, या विचारानं मी भांबावून जाणं हे स्वाभाविकच होतं!

माझ्या गाण्याबद्दल मी सारखा विचार करू लागलो. माझ्या गाण्याला फार दिवस लोटले नव्हते. मला उपजतच गाण्याची उत्तम समज आहे, हे ओळखून माझे गुरू मेहबूबखान यांनी मला गाण्याचं शिक्षण दिलं होतं. उगाच माझ्यावर खानदानी गायकीचं दडपण न आणता 'शाकुंतल', 'सौभद्र' आणि 'रामराज्य वियोग' या नाटकांतील किर्लोस्कर-देवलांची साधीसोपी, सुलभ पदं त्यांनी मला शिकविली होती.

या साऱ्या विचारानं मला थोडा धीर आला. माझ्या डेक्कन कॉलेजातील गाण्याच्या कार्यक्रमांची मला आठवण झाली. त्या कार्यक्रमांची ख्याती सर्व महाराष्ट्रात पसरली होती. मला कार्यक्रमांची निमंत्रणंही येऊ लागली होती. ही गोष्ट कदाचित लोकमान्यांच्याही कानी गेली असावी. माझे चुलते यशवंतराव

कुलकर्णी ‘केसरी’ कचेरीत ‘हिशेबनीस’ म्हणून काम बघत होते. मी चांगला गातो हे लोकमान्यांना माझ्या चुलत्यांकडून समजलं असावं.

लोकमान्य एके दिवशी माझ्या चुलत्यांना म्हणाले, ‘‘काय हो, तुमचा पुतण्या म्हणे चांगला गातो. एकदा ऐकवा तरी त्याचं गाणं आम्हाला!’’

मला या गोष्टींचा थोडाफार उलगडा झाला तेव्हा माझं मन थोडं शांत झालं. परंतु कार्यक्रमाचा दिवस प्रत्यक्ष उजाडला तेव्हा माझ्या मनातील धाकधुक पुन्हा वाढली. आम्ही कार्यक्रमासाठी तांग्यातून जायला निघालो. आमची वाट स्मशानातून जाणारी होती. स्मशान बघून तर माझ्या मनात धडकीच भरली. त्या गारठ्यात मी आणखीनच गारठून गेलो. काका माझ्याशी काहीतरी बोलत होते; परंतु माझं लक्ष कार्यक्रमाच्या ठिकाणाकडे लागलेलं होतं. कार्यक्रम कसा काय होणार ही धाकधुक मनातून जात नव्हती.

कसाबसा आमचा तांगा लोकमान्यांच्या दारापर्यंत जाऊन पोहोचला.

माझ्या अंगात थंडीनं हुडहुडी भरून आली होती; परंतु घरात प्रवेश केल्यावर अंगात ऊब निर्माण झाली. मला थंडी वाजेल म्हणून कार्यक्रमाच्या ठिकाणी शेगड्या ठेवल्या होत्या. त्यामुळे उबदार वातावरण निर्माण झालं होतं.

कार्यक्रम सुरू झाला. माझ्या ठराविक पदानंच प्रारंभ केला आणि नेहमीच्या क्रमानं पदांचं गायन केलं. गळ्यावर बसलेली पदं गायल्यामुळे कार्यक्रम उत्तरोत्तर रंगतच गेला.

माझं गाणं लोकमान्य मोठ्या तद्रूपतेनं ऐकत होते. गाणं ऐकताना ते येरझारा घालत होते; परंतु त्यांचा एक कान माझ्या गाण्याकडे होता.

माझं गाणं संपल्यावर यशवंतदादांकडे बघून लोकमान्य म्हणाले, ‘‘किती रे सुरेख गायला हा! याला ‘बालगंधर्व’ म्हणावं लागेल!’’

त्यांचे शब्द कानी पडताच मी धन्य झालो. आजही ती धन्यता माझ्या मनातून नाहीशी झालेली नाही.

त्या वेळी त्यांनी यशवंतरावांना उद्देशून उच्चारलेले शब्द माझ्या कानावर आले, ‘‘अरे, याला शिक्षणाबरोबर गायनाच्या व्यासंगावरही जास्त भर देऊ दे! हा फार मोठा गायक होणार आहे, यात शंकाच नाही!’’

या गोष्टीचा मला आजही पदोपदी प्रत्यय येत आहे.

मध्यंतरी बरीच वर्षं गेली.

किर्लोस्कर कंपनीच्या एका कार्यक्रमाच्या वेळी लोकमान्य तिथे आले

होते. त्या भेटीत जवळच्या मंडळींनी माझा निर्देश करून त्यांना विचारलं, ''हा कोण माहीत आहे का?''

लोकमान्य चटकन म्हणाले, ''अरे, हा तर आपला बालगंधर्व!''

लोकमान्यांची ही प्रखर स्मरणशक्ती बघून मी आश्चर्यचकित होऊन गेलो.

आजही तो प्रसंग आठवला म्हणजे माझी तीच अवस्था होते; आणि त्या थोर महापुरुषासमोर नतमस्तक होऊन मी मनाशी म्हणतो, ''दादा, आजही मी तुमचा तोच बालगंधर्व आहे!''

◆


**नवी संहिता... नवा आशय...**


**द हिडन हिंदू**

तीन कथांच्या मालिकेतील भाग दुसरा

**अक्षत गुप्ता**

अनुवाद

**मुक्ता देशपांडे**





देशभरातील वाचकांवर मोहिनी घालणाऱ्या, अल्पावधीत बेस्ट सेलर्स ठरलेल्या 'द हिडन हिंदू' मालिकेचा दुसरा भाग आता मराठीत

**किंमत : २८०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## नवी संहिता... नवा आशय...

# थर्ड मॅन





**डॉ. संजय ढोले**

भविष्यवेधी विज्ञानाची आस, हाच समाजाचा, राष्ट्राचा व देशाचा प्रगतीचा इतिहास!

**किंमत : २४०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# हारीक





**संजीव गिरासे**

हारीक सांगतं सांगड असावी तत्त्व आणि पैशांची
नसावी हाव स्वसुखाची

**किंमत : २५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## पुस्तकाच्या पानांतून




# चंबळेच्या पलीकडे

**स. शं. देसाई**

*महादजींच्या निष्ठेची आणि वीरतेची विस्मयकारक गाथा*

'उत्तरायण' सुरू झाले. अरुणाच्या रथावर बसून संक्रांतीच्या पूर्वकाळाची चाहूल घेत सूर्यनारायण पूर्वक्षितिजाकडे झेपावले. त्यांनी १४ जानेवारी, १७६१च्या पहाटे अतीव अधीरतेने अंधाराला हटवीत हटवीत आपले डोळे किलकिले करून पाहिले. पानिपतच्या पावनतीर्थाकडे पाहताच अरुणाचा रथ एकदम थांबला. जणू त्याच्याच स्वागतासाठी असंख्य तंबू-राहुट्यांवर जरीकिनार लेवून अरुण केतू फडकत होता. एवढी कडाक्याची थंडी! अशा वेळी उबदार अंथरूण सोडलेल्या असंख्य माणसांची कमालीची वर्दळ अरुणानं पाहिली. आपल्या भरधाव रथावरून

गुलाल उधळत अष्टदिशांनी उज्ज्वल रक्तस्नान घडवून अभिमानाने उभ्या असणाऱ्या अरुणाकडे पाहायला आज एवढी उसंत तरी कोणाला होती? यमुनेच्या अंगावरील सावट धुण्यासाठी भीमा-कृष्णा-गोदेचं पाणी खळखळून उसळत होतं. प्रगतीच्या पावलांनी उत्तरोत्तर झेपावत आलेली मराठी साम्राज्य-सूर्याची असंख्य किरणे नव्या संक्रमणाची चाहूल देत-घेत पानिपतच्या परिसरात उभी होती.

सदाशिवरावभाऊ आपल्या तंबूसमोर उगवत्या सूर्याला अर्घ्य देण्यासाठी उभे होते. त्यांनी आपल्या भरदार छातीवर दोन्ही हात जोडले. दंडातील स्नायू तरारून उठले. तेजस्वी डोळे तेजोभास्कराकडे कटाक्ष करून नम्र झाले. धीरगंभीर शब्दांत ते म्हणाले, ''नारायणा, तूच साक्ष आहेस. उत्तरेच्या काळोखावर तुटून पडायचा मुहूर्त तर झालेलाच आहे. निघालो तो उराशी विश्वास कवटाळूनच. आता विजयाशिवाय मागं फिरणार नाही.''

भाऊसाहेब लगबगीने आत गेले. विश्वासराव कपडे करून कमरेची समशेर बांधीत होते. हत्तीवरील अंबारी सजून तयार होती. भाऊसाहेब कपडे चढवीत म्हणाले, ''चला, निघालंच पाहिजे.'' आणि क्षणभरात ते निघालेही. जरीपटक्याचा कळस पिवळ्या उन्हाने झळाळून चमकला. झेंड्याचे केशरी गोंडे वाऱ्याच्या लहरीवर स्वैर उधळले. आता कुणाला क्षणाचीसुद्धा उसंत नव्हती. मराठी फौजा लगबगीने आपापल्या ठरल्या ठिकाणाकडे दौडत निघाल्या. सारे इशाऱ्यावर चालले होते.

इशारा तर स्वारींच्या हत्तींनीही टिपला. लवलवत्या सोंडेने रणमैदानाच्या मध्याकडे त्यांची पावले झपाट्याने पडली. भाऊसाहेबांची तीक्ष्ण नजर दूरवर उडणाऱ्या धुळीतून गिलच्यांच्या फौजेचा वेध घेत गेली. फौजेच्या मध्यभागी स्वारीचे दोन्ही हत्ती येऊन उभे राहिले. उधाणलेल्या सेनासागराला भरते आले. त्यांच्या मुखी उमटलेल्या उत्स्फूर्त जयघोषाच्या निनादलहरी क्षितिजावर जाऊन आदळू लागल्या. अनिमिष नेत्रांनी भाऊसाहेब आपल्या सेनेकडे साभिमान पाहत राहिले नि विश्वासरावांस म्हणाले, ''मराठी दौलतीसाठी तळहातावर शिर घेऊन उभ्या राहिलेल्या या वीरांकडे पाहिलं की वाटतं, थोरल्या महाराजांची कोण ही पुण्याई!''

चमकत्या नजरेने सभोवार पाहत विश्वासरावांनी प्रदीर्घ श्वास घेतला आणि समोर दूरवर भिडणाऱ्या धुळीच्या ढगाकडे नजर रोखीत म्हटले,

''पण काका, त्या पुण्याईच्या जिवावर उठलेले हे गिलचे, दुराणी पाहिले की...''

''ते आव्हान स्वीकारूनच समशेरीला हात घालावा लागतो.'' भाऊसाहेबांनी विश्वासरावांचे वाक्य पुरे केले. निळ्या आकाशावर पसरत चाललेल्या धूसर दिशांकडे पाहून त्यांनी सपकन उपसलेल्या समशेरीचे टोक ढगाकडे रोखले अन् ते गरजले, ''आता थांबायला अवसरच नाही विश्वास!'' आणि मग त्यांनी तसाच नौबतीला इशारा केला.

नौबत दणाणली. आकाश दुमदुमले. गगनाच्या गाभाऱ्यातून मराठी मनाला 'हरहर महादेव'ची साथ मिळाली. लगाम खेचले गेले. कान टवकारून घोडी फुरफुरली. त्यांच्या थरथरत्या पुष्ट पाठींतून बिजली चमकून गेली. मागच्या दोन्ही खुरांवर उभ्या राहिलेल्या पुढच्या टापा आज्ञेसाठी आसुसल्या. ताठ शेपट्या घुसळण घेऊ लागल्या. पोलादी मनगटांच्या वज्रमुठींनी समशेरीची पकड घेतली. आणि सकाळी नऊच्या सुमारास मराठे आणि गिलचे यांच्यामधील लढाईस तोंड लागले.

पंचावन्न हजार घोडदळ व पंधरा हजार पायदळ अशी सत्तर हजारांची मराठी सेना पाठीशी घेऊन निधड्या छातीचे सदाशिवरावभाऊ आघाडीच्या मध्यावर उभे होते. शेजारीच उजव्या हाताला विश्वासराव फौजेची रचना न्याहाळीत एकेक अनुभव घेत होते. डाव्या बाजूस इब्राहिमखान गारदी, उजव्या बाजूस मल्हारराव होळकर आणि जनकोजी शिंदे यांसारखे कसलेले अनुभवी सरदार आपापल्या सेनादलानिशी जातीने हजर होते. पायदळात इब्राहिमखान गारद्याच्या नऊ हजारांच्या कवायती फौजेचा समावेश होता. दमाजी गायकवाड, अंताजी माणकेश्वर, पिलाजी जाधव आणि त्याचे मुलगे, सटवोजी जाधव, यशवंतराव पवार यांसारखे मातबर मराठी सरदार पानिपतच्या मैदानावर रणदेवतेच्या पूजेसाठी सिद्ध झाले होते. याशिवाय समशेरबहाद्दूर नि काही छोटे रजपूत संस्थानिकही आपापल्या शिबंद्यांसह गिलच्यांशी लढण्याच्या ईर्ष्येने हजर होते. अनुपस्थिती जाणवत होती ती नागपूरकर भोसल्यांचीच.

सूर्य माथ्याकडे सरकत होता. मराठी फौज गिलच्यांकडे सरसावून झेपावत होती. चौफेर नजर फिरवीत भीमपराक्रमी भाऊ हत्तीवरील हौद्यात उभे राहून सरदारांना इशारे करीत होते, सैनिकांना स्फुरण देत होते, गिलच्यांच्या फौजेचा अंदाज घेत होते. समोरच दूरवर पसरलेल्या अब्दालीच्या सेनेवर

त्यांची नजरच ठरत नव्हती. त्यांची मान किंचित उचलली. क्षणात थोडी उजवीकडे वळली. वरच्या दाताने खालचे ओठ दाबून ते सहजपणे उद्गारले, ''विश्वास, गाठ तर जबरदस्त शत्रूशी आहे!''

आपल्या काकांची प्रत्येक हालचाल विश्वासराव न्याहाळीत होते. इतक्या मोठ्या अनोळखी रणमैदानात प्रथमच उतरल्याने त्यांच्यासारख्या अननुभवी दृष्टीला प्रारंभी तरी गोंधळल्यासारखे होणे स्वाभाविक होते. तरीपण भाऊसाहेबांच्या प्रत्येक हालचालीगणिक त्यांचा आत्मविश्वास नि:संशय दुणावत होता. भय केव्हाच संपले होते. लढण्याची ईर्ष्या बळावत होती. काकांचे ते शब्द ऐकताच ते म्हणाले, ''जबरदस्त शत्रूशी गाठ आहे म्हणूनच पुण्याहून पेशव्यांना पानिपतावर यावं लागलं आणि दक्षिणोत्तर भारत एक असल्याचं चित्र जगाला दिसलं!''

दूरवर अब्दालीच्या सैन्याची फळी कशी फोडावी याचा विचार करीत असतानाच शत्रूचा मागोवा घेऊन आलेला हेर भाऊसाहेबांच्या हत्तीजवळ येऊन उभा राहिला. क्षणभरात अब्दालीच्या सैन्याची रचना भाऊसाहेबांना स्पष्टपणे उमगली. सुमारे ऐंशी ते पंचाऐंशी हजार सेनेची फळी उभारून मध्यभागी अहमदशा अब्दालीचा वजीर शाहवलीखान पंधरा हजार सैन्यानिशी खडा होता. त्याच्या डाव्या बाजूस बरखुरदार, अमीरबेग, दुंडीखान, हफीज रहमत आणि अहमदखान बंगश हे उभे होते आणि डाव्या बाजूस अब्दालीचे दोस्त अन् पानिपतच्या प्रलयाचे सूत्रधार नजीबखान रोहिला आणि नबाब सुजाउद्दौला हे दोघेजण आपल्या अठरा हजार फौजेनिशी सिद्ध होते. त्यांच्या मदतीला अब्दालीने आपला एक नाणावलेला सरदार शाह पसंदखान याची खास पाच हजार कडव्या दुराणी स्वारांनिशी योजना केली होती. स्वत: अहमदशा अब्दाली दहा हजारांचे राखीव सैन्य घेऊन मुख्य फळीच्या पिछाडीस सुसज्ज होऊन उभा होता. कोणत्याही क्षणी, कोणत्याही परिस्थितीत, रणांगणाच्या कोणत्याही स्थानी क्षणार्धात दौडत जाण्याची तयारी त्याने ठेवली होती.

भाऊसाहेबांना सारे चित्र स्पष्ट झाले. क्षणभर त्यांनी डोळे मिटले. मराठी सैन्याची अवस्था त्यांना धक्का देऊन गेली. गेल्या कित्येक दिवसांची उपासमार व रोगराई, आणि त्यात गिलच्यांशी होणाऱ्या चकमकींची भर! आपल्या सेनेची घटलेली संख्या त्यांना कुठेतरी सल लावून गेली; पण

अशाही परिस्थितीत अतूट हिमतीने लढणाऱ्या आपल्या सेनेची ईर्ष्या आणि जिद्द पाहून ते रोमांचित झाले. 'खरंच, अशा प्रसंगी अटकेवर झेंडा फडकविणारे राघोभरारीसारखे प्रथम दर्जाचे सेनापती इथं असायला हवे होते,' असा विचार त्यांच्या मनात चमकून गेला.

पण, त्यांचा तरी काय इलाज होता! या वेळी तर ते पेशव्यांशी भांडण करून पुण्यातच रुसून बसले होते. 'या मोहिमेची सूत्रं पेशवे आपणाकडे देत असतील तर त्यांनी खर्चासाठी एक कोट रुपये दिले पाहिजेत,' अशी त्यांची मागणी पेशव्यांनी नाकारली होती. पेशवे तरी काय करणार! खजिना तर केव्हाच रिता झाला होता. राघोबादादांनी आपल्या मोहिमेच्या वेळी करून ठेवलेल्या कर्जाचा डोंगर फेडताफेडताच पेशव्यांची दमछाक झाली होती. छे छे, एक कोट रुपये पेशव्यांकडे नव्हतेच. स्वराज्यावर संकट कोसळत असता दादासाहेब हे असे अडून बसले! राजस्थानातील नागोरच्या लढाईत जयाप्पा शिंदे राजपूत राजा बिजेसिंगाने घातलेल्या मारेकऱ्याच्या सुऱ्याला बळी पडून ठार झाले. राणोजी शिंद्यांचे हे दोन सुपुत्र म्हणजे सिंहपराक्रमी अनुभवी सेनापती!! 'आज इतक्या इर्ष्येनं लढणाऱ्या आपल्या मराठी सेनेला असे सेनापती हवे होते.' भाऊसाहेबांचे मन त्यांना भूतकालाचा विचार करायला लावीत होते आणि वर्तमानाची जाणीव त्यांना चौफेर लक्ष ठेवावयास लावून पुढे सरकवीत होती. त्यांची नजर आपल्या फळीच्या उजव्या अंगावर खिळली.

वीस वर्षांचा तरणाबांड जनकोजी शिंदे आपल्या सेनेच्या आघाडीवर रुद्रभैरव बनून खडा होता. वडिलांची नि काकांची उणीव या तरण्याबांड पोरानं भरून काढलेली दिसत होती. मराठी राज्याच्या सेवेसाठीच नातवाच्या रूपानं जणू राणोजी शिंद्यांची सळसळती समशेर सरसावली होती. भाऊंना वाटले, सेनापती पडला तरी सैनिकांनी पुढे होऊन घुसायचे असते. अशा प्रवृत्तीतूनच तर नवे सेनापती लाभत असावेत! माणसं शरीरानं गेली तरी त्यांचं वागणं अशी मनं घडवून जातात. भाऊसाहेबांना स्फुरण आले. नजर १७ वर्षांच्या कोवळ्या विश्वासरावांकडे वळली. एवढ्या मोठ्या सेनेचा सेनापती बनलेला हा कोवळा पोर, त्यांच्या बरोबरीने पुढे घुसत होता. 'अशा अनुभवातूनच उद्याचं नेतृत्व उभं राहणार आहे' असे म्हणून स्वत:च्या जोखमीवर ते त्याला बरोबर घेऊन आले होते.

स्वराज्यासाठी अशा मोहिमेत साऱ्या लहान-थोरांनी जीव ओतून सामील व्हावे यात अस्वाभाविक काहीच नव्हते. जनकोजीच्या पलीकडच्या अंगास सुभेदार मल्हारबाबा होळकर धिमेपणाने पुढे सरकत होते. आज हा धिमेपणा वृद्धापकाळी एकुलत्या एक तरुण मुलाच्या अपमृत्यूने आला होता की आयुष्यभरच्या अनुभवामुळे, हे कळणे कठीण होते. त्यांच्या भाल्याची नेहमीची धार आज बोथट भासत होती.

भाऊसाहेब दचकले. मल्हारबाबांचे मन आज लढाईत नसावे असे त्यांना चांगलेच जाणवले. चार दिवसांपूर्वीच्या रात्री उडालेला खटका त्यांना जसान् तसा आठवला. शामियान्याच्या अंधुक प्रकाशात रागाने थरथरत उभे असलेले मल्हारबाबा त्यांच्यासमोर बोलत उभे राहिले. ''आमचं म्हणणं इतकंच की, गिलच्यांशी समोरासमोर सामना देण्याचं धाडस पेशव्यांनी करू नये.'' मल्हाररावांनी नजर रोखून म्हटले.

''आम्हालाही समजतं सुभेदार! गनिमी काव्यानं लढण्याचा तुमचा सल्ला मानण्यात शहाणपणा तरी कोणता? अशी लढाई खेळायची ठरली, तर किती दिवस असं रखडावं लागेल याची कल्पना आहे तुम्हाला?'' भाऊसाहेबांनी स्वर चढविला.

''शहाणपणा शिकविण्याची भाषा कोणाला सांगता, श्रीमंत! आपली कुवत ओळखूनच जरा सबुरीनं चलण्याचा सल्ला आम्ही दिला. दुराणी अब्दाली म्हणजे काही दख्खनमधील निजाम नव्हे. तो एक धूर्त आणि कसलेला सेनापती आहे. त्याची फौज मध्य आशियात अनेक ठिकाणी लढून कसलेली आहे. त्याच अनुभवाच्या जोरावर त्यांनी उत्तर हिंदुस्थानच्या अनेक लढाया मारल्या. शत्रू असा जबरदस्त! हे श्रीमंतांनी जरा समजून असावं.''

''आम्ही ठीक समजलो सुभेदार. उत्तरेच्या अनुभवासाठीच आलोत आम्ही. उदगीरचा अनुभव घेतला तसाच उत्तरेच्या कुंजपुऱ्याचाही. आमच्याजवळ कवायती फौज आहे. उदगीरला निजामाचा जसा चक्काचूर केला तसाच पानिपतावर गिलच्यांचाही करू, यात आम्हाला काडीमात्र संशय नाही.''

सुभेदारांनी भाऊसाहेबांवर धारदार नजर रोखली. थरथरत्या ओठांतून थाडथाड शब्द उडाले, ''श्रीमंत, उदगीरची धुंदी जरा उतरू द्या. त्या धुंदीतच तर सारी उताविळी होते आहे, म्हणून बोलण्याचे धाडस करतोय. एकच धोपट मार्ग सर्व ठिकाणी उपयोगी पडत नसतो. आमचं एक सोडून

द्या; पण त्या धुंदीतच तर आपल्या वीस हजार सुसज्ज फौजेसह मराठ्यांच्या छावणीत आलेल्या सूरजमल जाटासारख्या धुरंधर योद्ध्याची तुम्हाला बूज राखता आली नाही. आपणहून आलेल्यास अपमानित करून माघारी दवडलंत...''

''बस्स झालं सुभेदार!'' उपरोधिकपणे भाऊसाहेबांनी मल्हाररावांना रोखीत म्हटले, ''जसे आम्ही स्वारीवर निघालो तसे साऱ्यांनीच उपदेशाचे घोट दिले. पण आता...''

''तुम्हाला काही ऐकायचं नाही असंच ना! खुशाल हेका चालवा आपला. आपण मुखत्यार आहात. दौलतीसाठी आज आम्ही मानू; पण ध्यानात घ्यावं श्रीमंत, सेनापतीनं माणसं सांभाळायची असतात. मनं जोडायची असतात. आपण कुशल योद्धे आहात, शूर आहात, पराक्रमी आहात, तुमची तडफ आम्ही मानतो; पण धिमेपणा नि धोरणीपणाशिवाय सूत्रं हलविणाऱ्या उतावळ्या सेनापतीचे सारे गुण धोक्यात असतात, व्यर्थ असतात. शिवाय ज्या कवायती फौजेच्या जिवावर तुमचे सारे मनसुबे, त्यांच्या सेनापतीचा – इब्राहिमखानाचा – सल्ला तरी तुम्ही कोठे मानता? राहवेना म्हणून – कर्तव्य म्हणून – सांगायला आलो. इत:पर तुमची मर्जी.'' असे म्हणून मल्हारबाबा झटक्यासरशी बाहेर पडले होते.

मल्हारबाबांसारख्या कसलेल्या योद्ध्याच्या अशा रोषाने भाऊसाहेबांना सुन्न केले होते. गनिमी युद्धात गिलच्यांना जेरीस आणण्याचा त्यांचा सल्ला टाकाऊ नव्हता खास; पण का कुणास ठाऊक, आज त्यांच्या याच सल्ल्याने मल्हारबाबांबाबत ते अधिक साशंक झाले. मल्हारबाबांचे नजीबखान रोहिल्याशी आतून संधान असल्याचे जे त्यांच्या कानी आले होते, त्यात त्यांना अधिक तथ्य वाटू लागले. आणि म्हणूनच आता अधिक वेळ न घालविता पानिपतच्या मैदानावर गिलचे व रोहिले यांना धडा शिकविण्याच्या आत्मविश्वासाने आपल्या चतुरंग सेनेसह ते उभे ठाकले होते. उदगीरच्या आणि कुंजपुऱ्याच्या लढाईतील त्यांच्या तलवारकुशलतेने नि अचूक नेमबाजीने मिळवून दिलेल्या विजयानेच त्यांना या साहसास अधिक उत्तेजित केले होते. मल्हारबाबांप्रमाणेच इतर अनुभवी सेनापतींचा सबुरीने घेण्याचा सल्ला त्यांनी सरळसरळ धुडकावून लावला होता आणि इब्राहिमखान गारद्याच्याही सल्ल्याची भाऊसाहेबांच्या हेकेखोर व तापट स्वभावाने साफ वाट लागली होती.

◆

## नवी संहिता... नवा आशय...


# डिलिव्हरिंग हॅपिनेस

**टोनी शे**

अनुवाद

**सुनीति काणे**

नफा, उत्कट प्रयत्न आणि
उद्दिष्टाकडे वाटचाल





**किंमत : ४३०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.**

# हिटलर आणि भारत

**वैभव पुरंदरे**


अनुवाद

**जी. बी. देशमुख**




भारत देश आणि या देशातल्या माणसांविषयी हिटलरच्या मनात
असलेल्या द्वेषाची अकथित कहाणी

**किंमत : २७५/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**




# स्फिंक्स

**डॉ. रॉबिन कुक**

अनुवाद

**डॉ. प्रमोद जोगळेकर**

*एका विलक्षण खजिन्याचा लागला एरिका बॅरनला सुगावा... आणि मग सुरू झाला थरारक पाठलाग आणि निर्घृण हत्यांची मालिका... प्राचीन खजिन्यासाठी अर्वाचीन काळात रंगलेला रक्तरंजित, उत्कंठावर्धक संघर्ष*

*इसवी सनपूर्व १३०१. तुतनखामुनचे थडगे*
*व्हॅली ऑफ द किंग्ज. थीब्जचे नेक्रोपोलिस*
*सूर्यदेव 'रा'चा पुत्र, दक्षिण व उत्तर इजिप्तचा राजा*
*फॅरो पहिला सेती याच्या कारकिर्दीचे दहावे वर्ष*
*पावसाळ्यातील चौथ्या महिन्यामधला दहावा दिवस*

इमेनीनं तांब्याची छिन्नी समोरच्या चुनखडीच्या दगडांनी बनलेल्या भिंतीत जोरानं ठोकली. आतली भिंत चांगली कणखर आहे हे त्याच्या लक्षात आलं. परंतु खात्री करून घेण्यासाठी त्यानं पुन्हा छिन्नी ठोकली. आता मात्र आपण आतल्या दरवाजापाशी पोहोचलो आहोत हे त्याला समजलं. या भिंतीच्या पलीकडे त्याला कल्पनाही करता येणार नाही एवढा खजिना दडलेला होता. याच भिंतीच्या पलीकडे एकावन्न वर्षांपूर्वी तेव्हाचा तरुण फॅरो तुतनखामुन याला चिरविश्रांतीसाठी पुरण्यात आलं होतं.

आपण आतल्या भिंतीपाशी आलो आहोत हे कळल्यानंतर इमेनीचा उत्साह वाढला. पण तिथं उडणाऱ्या धुळीमुळे श्वासोच्छ्वासाला त्रास होत होता. त्याच्या रेखीव चेहऱ्यावरून घामाचे थेंब सतत टपटप पडत होते. गडद अंधार असलेल्या अगदी अरुंद भुयारात पोटावर झोपूनच इमेनीला काम करावं लागत होतं. सडपातळ बांध्याचा असूनही इमेनी जेमतेम त्या भुयारात मावला होता.

त्यानं समोर खणलेला चुनखडीचा दगड पोटाखालून सरकवत पायाकडे ढकलला आणि मग मागे रेटला. मग बिळात उकरत जाणाऱ्या किड्याप्रमाणे त्यानं दगडाच्या कपच्या मागे रेटत हळूहळू पुढे सरकायचा प्रयत्न केला. त्यानं मागे रेटलेल्या दगडाच्या कपच्या त्याच्या बरोबर असणारा केमेसी एका वेताच्या टोपलीत भरत होता.

इमेनीच्या हातांना जागोजागी घासून खरचटलं होतं. पण तशा बोटांनी समोरच्या टणक भिंतीला स्पर्श करूनही त्याला वेदना जाणवत नव्हत्या. अंधारातच बोटांनी चाचपडून त्यानं गिलावा केलेल्या भिंतीवर लावलेली तुतनखामुनची मोहर अखंड असल्याची खात्री करून घेतली. एकावन्न वर्षांपूर्वी त्या तरुण राजाचं दफन केल्यानंतर हा दरवाजा परत कधीच उघडला गेलेला नाही हे त्याच्या लक्षात आलं.

डाव्या कोपरावर किंचित रेलत इमेनीनं अंग जरासं सैल सोडलं. सतत खणण्याच्या कामामुळे तो थकला होता. त्याचे खांदे ठणकत होते. त्याच्या मागच्या बाजूला दगडमाती भरण्याचं काम करणारा केमेसीही श्वास घ्यायला त्रास होत असल्यानं धापा टाकत असल्याचं इमेनीला जाणवलं. ''आपण आतल्या दरवाज्यापाशी पोहोचलो आहोत,'' इमेनी म्हणाला. त्याच्या उत्तेजित स्वरात किंचित धास्तीची छटा होती. कधी एकदा हे काम पूर्ण होतंय असं

इमेनीला झालं होतं. इमेनी चोर नव्हता. पण त्या वेळी मात्र तो चिरविश्रांती घेत असलेल्या तुतनखामुनच्या थडग्यात भुयार खोदून आत शिरला होता.

''जा, इरामेनकडून माझी लाकडी हातोडी घेऊन ये,'' इमेनी केमेसीला म्हणाला. त्या अरुंद जागेत त्याचा आवाज घुमत असल्यानं विचित्र वाटत होता. इमेनीला आपल्याच आवाजाचं आश्चर्य वाटलं.

दरवाजापाशी पोहोचलेल्या बातमीनं खूश झालेला केमेसी चित्कारत वेताची टोपली मागे ओढत घाईघाईनं मागे सरकू लागला. भुयारात आता नीरव शांतता पसरली होती. इमेनीला भुयाराच्या भिंती सगळ्या बाजूंनी आपल्याला दडपत असल्याचं वाटू लागलं. अंधारात तसं असल्यानं वाटणारं भय त्यानं दूर ठेवण्याचा प्रयत्न केला. आपला आजा अमेनेमहेब यानं तुतनखामुनच्या थडग्याचं बांधकाम करून घेताना असंच काम केलं असणार हा विचार त्याच्या मनात आला. आपण ज्या भुयारात काम करतोय तिथल्या आजूबाजूच्या भिंतींना आपल्या आजोबाच्या हातांचा स्पर्श झाला असणार हे त्याला जाणवलं. उताणा होत त्यानं खरोखरच बाजूच्या टणक भिंतीला हात लावून बघितला. त्यामुळे त्याला जरा बरं वाटलं.

तुतनखामुनच्या थडग्याचा नकाशा इमेनीचा आजा अमेनेमहेब यानं त्याचा मुलगा म्हणजे इमेनीचा बाप पेर नेफेर याला दिला होता. त्यानं तो इमेनीला दिला होता. हा नकाशा अगदी अचूक आहे हे इमेनीला कळलं होतं, कारण बाहेरच्या दरवाजापासून नेमकं बारा क्यूबिट[१] खणल्यावर तो आतल्या दरवाजापाशी पोहोचला होता. या आतल्या भिंतीच्या मागे थडग्याचा मुख्य भाग होता आणि त्याला जोडून असणारी छोटी खोली होती. इथवर येण्यासाठी त्यांना पाठ मोडेस्तोवर सलग दोन रात्री काम करावं लागलं होतं. पण आता त्या पहाटेपर्यंत काम संपणार होतं. इमेनीनं सोन्याचे फक्त चार पुतळे तिथून उचलायचा बेत केला होता. त्याच्या आजोबानं दिलेल्या नकाशात त्यांची नेमकी जागाही दाखवलेली होती. एक पुतळा आपल्यासाठी आणि इतर तिघांना प्रत्येकी एक असं इमेनीनं ठरवलं होतं. त्यानंतर तो थडगं पुन्हा सीलबंद करून टाकणार होता. आपण हे असं का करतोय हे देवांना कळेल अशी इमेनीला आशा होती, कारण तो स्वत:साठी ही उचलेगिरी करत नव्हता. त्याच्या आईबापांच्या शरीरांना सुरक्षित करून दफन करण्यासाठी त्याला सोन्याच्या एका पुतळ्याची गरज होती.

केमेसी पुन्हा भुयारात शिरला. त्यानं स्वत:समोर ढकलत आणलेल्या वेताच्या टोपलीत लाकडी हातोडी आणि तेलाचा दिवा होता. शिवाय त्या टोपलीत बैलाच्या हाडाची मूठ बसवलेली कांशाची कट्यार होती. केमेसी हा मुळातच चोर होता. सोन्याच्या लोभापायी कशाचीही तमा न बाळगणारा खराखुरा चोर.

इमेनीला कामाचा चांगला अनुभव असल्यानं छिन्नी-हातोडी वापरून समोरचे दगडाचे मोठे चिरे सुटे करायला त्याला फारसा वेळ लागला नाही. सध्या फॅरो पहिला सेती याच्या थडग्याच्या बांधकामावर इमेनीची नेमणूक झालेली होती. या फॅरोच्या एखाद्या विशाल गुहेसारख्या तयार होणाऱ्या थडग्याच्या तुलनेत तुतनखामुनचं थडगं नगण्य आहे, असा विचार त्याच्या मनात आला. पण तुतनखामुनच्या थडग्याला नगण्य समजून त्याच्याकडे केलं जाणारं दुर्लक्ष इमेनीच्या पथ्यावर पडलं होतं. तसं नसतं, तर इमेनी अशा प्रकारे तुतनखामुनच्या थडग्यात कधीच शिरू शकला नसता. फॅरो होरेनहेब यानं तुतनखामुनच्या सगळ्या स्मृती नष्ट करण्याचा हुकूम काढला होता. त्यामुळे तुतनखामुनच्या थडग्यापाशी त्याचा आत्मा 'का'[२] याच्या रक्षणासाठी ठेवलेले पहारेकरी काढून टाकले गेले होते. साहजिकच इमेनीचं काम सोपं झालं होतं. तिथं काम करणाऱ्या कामगारांना फक्त दोन मापं धान्य आणि थोडी बियर यांची लाच त्यानं दिली होती. पण याचीही तशी जरुरी नव्हती. कारण इमेनीनं तुतनखामुनच्या थडग्यात शिरायचं ठरवलं होतं, तेव्हा 'ओपे' हा वार्षिक उत्सव सुरू होता. त्यामुळे नेक्रोपोलिसचे सगळे जण आणि त्याच्या गावातले सर्व लोक नाईल नदीच्या पूर्व तीरावरील थीब्ज गावात जाऊन मौजमजा करण्यात दंग होते. हे सगळं असलं, तरी इमेनीच्या मनात सतत धाकधूक होत होती. त्या धास्तीमुळे थकवा वाटत असूनही इमेनी जोरजोरानं हातोडीचे घाव घालत होता. लवकरच त्याच्या समोरचा चिरा सुटा झाला आणि थड् असा आवाज करत पलीकडच्या बाजूला पडला.

इमेनीच्या काळजाचा ठोका क्षणभर चुकला. आता सैतानी जगामधली पिशाचं आपल्याला घेरणार अशी भीती त्याच्या मनात होती. पण तसं काही घडलं नाही. उलट देवदार वृक्षाच्या लाकडाचा मंद सुगंध आणि धूपाचा वास त्याला जाणवला. त्याचबरोबर तिथं अनंतकाळ टिकून राहिलेली संपूर्ण

शांतता त्याला जाणवत होती. तो या सगळ्यामुळे जरासा चकित झाला होता. त्यानं पुढे काम करत मार्ग काढला आणि मग अगोदर डोकं आत घातलं. मग तो आत उतरला.

आत विलक्षण शांतता होती आणि मिट्ट अंधार होता. हा अंधार हटणार नाही असं वाटत होतं. त्यानं मागे वळून पाहिलं. बाहेरून झिरपणाऱ्या हलक्या चंद्रप्रकाशात त्याला पुढे सरकणाऱ्या केमेसीची आकृती दिसली. एखाद्या आंधळ्या माणसाप्रमाणे चाचपडत केमेसीनं पुढे होत इमेनीच्या हातात तेलाचा दिवा, विस्तव पेटवण्याचं सामान ठेवलं.

''मी आत येऊ का?'' केमेसीनं विचारलं.

''नको. जरा थांब.'' इमेनी दिवा पेटवण्याचं काम करण्यात मग्न होता. ''जा आणि इरामेनला आणि अमासिसला अर्ध्या तासानं आपण भुयार पुन्हा बुजवायला सुरुवात करणार आहोत असं सांग.''

केमेसी कुरकुर करत एखाद्या खेकड्यासारखा भुयारातून मागे सरकत गेला.

इमेनीनं चक्रं घासताच त्यातून एकच ठिणगी पडली. त्या ठिणगीनं त्याच्या हातातल्या सुकलेल्या धाग्यांनी पेट घेतला. किंचित थरथरत्या बोटांनी इमेनीनं त्या पेटलेल्या धाग्यांनी दिव्यामधली वात पेटवली. वातीनं पेट घेताच दिवा उजळला आणि त्यानं अंधार दूर केला. दिवा पेटल्यानं तिथल्या थंडगार हवेत जराशी ऊबही आली.

दिवा लागताच इमेनी जागच्या जागी गोठला. आपण आता कोसळणार असं त्याला वाटलं. थरथरणाऱ्या प्रकाशात आपल्यासमोर एमनुट या मृतांना खाणाऱ्या राक्षसीचा चेहरा आहे हे त्याला दिसलं. इमेनीचे हात थरथर कापू लागले. तो चेहरा बघून तो एकदम मागे सरकून भिंतीला पाठ लावून उभा राहिला. त्यानं पुन्हा समोर नजर टाकली. पण राक्षसीचा चेहरा होता तिथंच आहे हे त्याला दिसलं. फरफरणाऱ्या दिव्याचा प्रकाश सोन्याच्या चेहऱ्यावर पडून त्याला एमनुटचे हस्तिदंतापासून बनवलेले दात आणि सुबक निमुळतं शरीर दिसलं. मग आपण एका मृत्युशय्येकडे बघत आहोत हे इमेनीच्या लक्षात आलं. बाजूला आणखी दोन अशाच शय्या होत्या. त्यामधल्या एकीला गायीचं तर एकीला सिंहाचं डोकं होतं. खोलीत उजव्या बाजूला प्रत्यक्ष दफनकक्षाचा दरवाजा होता. दरवाजाच्या दोन्ही बाजूंना रक्षण करण्यासाठी पोरसवदा तुतनखामुन राजाचे दोन पूर्णाकृती पुतळे होते. इमेनीनं सध्या काम

चालू होतं त्या ठिकाणी फॅरो पहिला सेती याचे असेच सोन्याचा मुलामा दिलेले दोन पुतळे बनवले जात आहेत हे बघितलं होतं.

इमेनी दफनकक्षाकडे जाणाऱ्या दरवाजापाशी आला. उंबरठ्यावर पडलेला सुकलेला फुलांचा एक हार त्याला दिसला. त्यानं तो काळजीपूर्वक टाळला. मग त्यानं दरवाजा उघडला. आत त्याला दोन सोनेरी पुतळे दिसले. एक दक्षिण इजिप्तमधल्या नेखबेत या गिधाड देवतेचा, तर दुसरा आयसिस या आदर्श मातृदेवतेचा होता. दोन्ही पुतळ्यांवर तुतनखामुनचं नाव नव्हतं. ही गोष्ट महत्त्वाची आहे हे इमेनीच्या लक्षात आलं.

छिन्नी आणि हातोडी वापरून इमेनीनं आता एमनुट असलेल्या मृत्युशय्येच्या खाली शिरून बाजूच्या भिंतीत भगदाड पाडलं. इमेनीचा आजा अमेनेमहेब यानं दिलेल्या नकाशानुसार इमेनीला हवे असणारे आणखी दोन पुतळे या बाजूच्या छोट्या कक्षात असणं अपेक्षित होतं. त्याला हे पुतळे असणारी खजिन्याची पेटी शोधायची होती. काहीतरी अशुभ घडणार की काय ही मनात सतत डोकावणारी शंका बाजूला सारत इमेनी त्या भगदाडातून आत शिरला. तेलाचा दिवा समोर धरून त्यानं पाहिलं आणि सुटकेचा नि:श्वास टाकला कारण तिथं कोणत्याही भीतीदायक गोष्टी नव्हत्या. या कक्षाच्या भिंती ओबडधोबड दगडांच्या होत्या. इमेनीला जी पेटी हवी होती ती त्याला दिसली. पेटीवर अत्यंत सुंदर असं दृश्य कोरलेलं होतं. या दृश्यात तुतनखामुनची तरुण राणी त्याला कमलपुष्प, पपायरस आणि अफूच्या बोंडांचा गुच्छ अर्पण करताना दाखवलेली होती. हे सगळं असलं तरी एक महत्त्वाची अडचण इमेनीच्या लक्षात आली. पेटीचं झाकण अत्यंत चतुराईनं घट्ट बसवलेलं असल्यानं ते उघडत नव्हतं. इमेनीनं हातातला दिवा देवदाराच्या लाकडापासून बनवलेल्या लालसर-तपकिरी झाकणावर ठेवला आणि तो ती पेटी नीट निरखून पाहू लागला. पण हे करत असताना आपल्या मागच्या बाजूला काय घडतंय याकडे त्याचं साफ दुर्लक्ष झालं होतं.

केमेसी जवळजवळ आत येण्याच्या बेतात होता तर इरामेन त्याच्या मागे होता. त्याच्या मागच्या बाजूला आडव्या बांध्याचा अमासिस आत शिरायची धडपड करत होता. भुयारातून आत शिरल्यावर केमेसीला आणि इरामेनला बाजूच्या खोलीतल्या भिंतीवर नाचणारी इमेनीची सावली दिसली. केमेसीनं कांशाची कट्यार आपल्या सडक्या दातांमध्ये घट्ट धरली आणि तो

डोकं आत घालून अलगद भुयारामधून आत आला. मग त्यानं इरामेनला आत यायला मदत केली. दोघं मग श्वास रोखून काही क्षण स्तब्ध उभे राहिले. फक्त दगडाच्या चुऱ्याचा अगदी हलका असा चिरडण्याचा आवाज येत होता. काही वेळातच अमासिस भुयारातून आत आला.

हे काम करताना सुरुवातीला वाटलेली भीती आता दूर होऊन त्या जागी हाव दिसू लागली. तिघं त्यांच्या भोवती पसरलेल्या खजिन्याकडे डोळे विस्फारून बघत होते. त्यांनी या असल्या वस्तू कधी कल्पनेतही बघितल्या नव्हत्या. भुकेल्या लांडग्यांच्या टोळीप्रमाणे तिघं तिथल्या खजिन्यावर तुटून पडले. त्यांनी खजिन्याच्या पेट्या उघडून रिकाम्या करायला आणि तिथल्या फर्निचरला लावलेलं सोनं उचकटून काढायला सुरुवात केली.

काहीतरी पडल्याचा पहिला आवाज इमेनीच्या कानावर पडला, तेव्हा त्याच्या काळजाचा ठोका चुकला. प्रथम त्याला आपण पकडले गेलो असं वाटलं. पण मग तिघांचा हर्षातिरेकानं किंचाळण्याचा आवाज ऐकल्यावर त्याला नेमकं काय घडतंय ते लक्षात आलं. हे सगळं एखाद्या वाईट स्वप्नाप्रमाणे होतं.

‘‘नको! नको!’’ तेलाचा दिवा उचलत इमेनी घाईघाईनं बाजूच्या खोलीतून बाहेर आला. ‘‘थांबा! सर्व देवांची शपथ!’’ त्याच्या घुमलेल्या आवाजानं तिघं क्षणभर चकित होऊन जागीच खिळले. पण मग लगेचच केमेसीनं त्याची कट्यार हातात घेतली. ते बघताच अमासिस हसला. त्यानं विचकलेल्या दातांवर दिव्याचा प्रकाश पडून त्याचं क्रूर हास्य इमेनीला दिसलं.

इमेनीनं झेप घेत हातोडी घेण्याचा प्रयत्न केला. पण केमेसीनं तिच्यावर क्षणात पाय ठेवला होता. आता अमासिस पुढे झाला. त्यानं एका हातानं इमेनीच्या हातातला दिवा धरला आणि दुसऱ्या हातानं इमेनीच्या कानशिलावर फटका मारला. त्या फटक्यानं इमेनी खाली कोसळला.

शुद्धीवर आला तेव्हा आपण किती वेळ बेशुद्ध होतो हे इमेनीच्या लक्षात येईना. पण शुद्धीवर येता क्षणी त्याला आपण कोणत्या भयंकर स्थितीत आहोत हे जाणवलं. दुखरी मान हळूहळू वळवून त्यानं बघितलं. त्याला अंधुक प्रकाशात हलणाऱ्या सावल्या दिसल्या आणि दबके आवाज पुसटसे ऐकू आले. तुतनखामुनच्या पुतळ्यांच्या मधल्या भागात त्याला केमेसी उकिडवा बसलेला दिसला. ते तिघं गावरान चोर तिथल्या अत्यंत

पवित्र जागेचं सगळं पावित्र्य नष्ट करत होते!

जराही आवाज होऊ न देता इमेनीनं हातपाय हलवले. त्याचा डावा हात त्याच्याच अंगाखाली अडकल्यानं बधिर झाला होता. तो त्यानं सोडवून घेतला. हे एवढं वगळता आपण ठीक आहोत हे त्याच्या लक्षात आलं. आपल्यापासून भुयाराचं तोंड किती लांब आहे याचा त्यानं अंदाज घेतला. ते जवळच होतं, पण त्यात वेगानं शिरणं अवघड जाणार होतं. इमेनी हलकेच हातापायांवर उभा राहिला. डोक्यामधला ठणका कमी व्हायची तो वाट बघत होता. तेवढ्यात अचानक केमेसी तिथं आला. त्याच्या हातात होरसचा सोन्याचा पुतळा होता. इमेनीला बघून तो क्षणभर जागीच थबकला. पण पुढच्याच क्षणी गर्जना करत त्यानं इमेनीच्या दिशेनं झेप टाकली. डोक्यातल्या ठणक्याकडे दुर्लक्ष करत तेवढ्यात इमेनीनं वेगानं हालचाल करून भुयारात सूर मारला होता. असं करताना त्याच्या पोटावर आणि छातीवर चांगलंच खरचटलं. दरम्यान केमेसीनं पुढे येऊन इमेनीचा घोटा पकडण्यात यश मिळवलं होतं. आता तो मदतीसाठी अमासिसला हाका मारू लागला. इमेनी पाठीवर उताणा झाला आणि त्यानं शक्ती एकवटून केमेसीच्या हातावर लाथ मारली. इमेनीच्या मोकळ्या पायाची जबरदस्त लाथ केमेसीच्या गालावर बसल्यानं त्याची पकड निसटली. पकड निसटल्याचा फायदा घेऊन इमेनी भुयारातून वेगानं बाहेर सरपटत निघाला. आपल्याला भुयाराच्या भिंतींना घासून किती जखमा होत आहेत याचं जराही भान त्याला नव्हतं. काही वेळातच तो बाहेर पडला आणि थीब्जकडे जाणाऱ्या रस्त्यावरून पहारेकऱ्यांच्या चौकीकडे धावत निघाला.

तिकडे आत तुतनखामुनच्या थडग्यात प्रचंड धांदल उडाली होती. आपण तत्काळ बाहेर पडलो तरच वाचण्याची पुसटशी संधी आहे हे तिघा चोरांच्या लक्षात आलं. खरं तर त्यांना अद्याप सगळा खजिना बघताच आला नव्हता. अमासिस अतिशय नाराजीनं उठून उभा राहिला. त्याच्या हातात वजनदार सोन्याचे अनेक पुतळे होते. केमेसीनं सोन्याची अनेक जाड वळी एका फडक्यात बांधली खरी, पण गडबडीनं बाहेर पडताना ती मध्येच खाली पडली. त्यांनी घाईघाईनं लुटलेल्या वस्तू टोपल्यांमध्ये भरल्या.

इरामेननं त्याची टोपली भुयाराच्या तोंडात सरकवली. मग तो स्वत: वर चढला. त्याच्या पाठोपाठ केमेसी आणि अमासिस होते. त्यांनी दिवा

अगोदरच मागे ठेवला होता. चढताना ॲलाबॅस्टरचा एक अत्यंत मौल्यवान चषक खाली पडला. भुयारातून बाहेर पडल्यावर त्यांनी दक्षिणेकडे म्हणजे पहारेकऱ्यांच्या चौकीची विरुद्ध दिशा घेतली. अमासिसजवळ न पेलवणारी लूट होती. आपला उजवा हात मोकळा करण्यासाठी त्यानं निळ्या रंगाचा फेआन्सचा पेला बाजूच्या खडकाखाली दडवला. मग तो भराभरा चालून इतरांना गाठण्याचा प्रयत्न करू लागला. जरा वेळानं त्यांनी हत्सचेप्सूतच्या देवळाकडे जाणारा रस्ता मागे टाकला. मग कामगारांच्या वसाहती असलेल्या खेड्याकडे न जाता ते बाहेर पडले आणि दरीपलीकडच्या विशाल लिबियन वाळवंटात शिरले. आता ते मुक्त आणि फार फार श्रीमंत झाले होते.

इमेनीनं यापूर्वी कधी शारीरिक यातना सहन केल्या नव्हत्या. आपण छळ, यातना सहन करू शकू की नाही याबद्दल तो साशंक होता. पण ते शक्य नव्हतंच. अचानक त्याच्या शरीरातली वेदना वेगानं असह्य झाली. त्याची काठीनं परीक्षा घेतली जाणार आहे असं त्याला सांगण्यात आलं होतं. पण म्हणजे काय ते त्याला कळलं नव्हतं. चार पहारेकऱ्यांनी त्याला एका कमी उंचीच्या टेबलावर त्याला घट्ट धरून पाडलं आणि मग पाचव्यानं त्याच्या तळपायांवर सपासप वेगानं मारायला सुरुवात केली.

''थांबा... थांबा... मी सगळं सांगतो,'' वेदनांनी श्वास कोंडलेला इमेनी कसाबसा असं म्हणाला खरा, पण त्यानं अगोदरच पन्नास वेळा त्याला जे माहीत होतं ते सगळं सांगितलेलं होतं. तळपायातली वेदना जळणारी होती. मध्यान्हीच्या उन्हामुळे ती जास्तच तीव्र झाली होती. आपले पाय तापलेल्या निखाऱ्यांवर आहेत असं त्याला वाटत होतं. कापल्या जाणाऱ्या कुत्र्यासारखा इमेनी भेसूर ओरडत होता. वेदना सहन न झाल्यानं त्यानं एका पहारेकऱ्याच्या हाताला चावायचा प्रयत्न केला होता. पण कोणीतरी त्याचे केस धरून त्याचं डोकं मागे खेचलं होतं.

आता आणखी यातनांनी इमेनीचं डोकं कामातून जाईल हे लक्षात येऊन नेक्रोपोलिसच्या रक्षकांचा मुख्य असलेल्या राजपुत्र मायानं त्याचा बोटांची निगा राखलेला हात हलवून मारपीट थांबवण्याचा इशारा केला. इमेनीला मारणाऱ्या रक्षकानं मारणं थांबवण्याआधी सोटा पकडून एक शेवटचा फटका मारला. उमललेल्या कळीचा सुगंध घेत उभा असलेला राजपुत्र माया इतरांकडे वळला. तिथं त्या वेळी पश्चिम थीब्जचा महापौर नेबमारे-नाख्त,

आणि फॅरो पहिला सेती याचा मुख्य वास्तुविशारद नेनेफ्ता हजर होते. त्यांच्यापैकी कोणीच काही बोललं नाही. मग माया इमेनीकडे वळला. इमेनी जमिनीवर उताणा पडलेला होता. अजूनही त्याच्या पावलांमध्ये जळती वेदना होत होती.

''हं, तर मला सांग... तुला फॅरो तुतनखामुनच्या थडग्याचा मार्ग कसा काय समजला?''

इमेनीला हिसडा मारून बसवण्यात आलं. इमेनीच्या डोळ्यांना समोरच्या तिघा उमरावांच्या प्रतिमा तरंगताना दिसत होत्या. हळूहळू त्याला नीट दिसू लागलं. उच्च पदावर असलेल्या नेनेफ्ताला त्यानं ओळखलं. ''माझ्या आजोबांनी...'' इमेनी अडखळत सांगू लागला, ''त्यांनी माझ्या वडिलांना नकाशा दिला. माझ्या वडिलांकडून मला तो मिळाला.''

''तुझा आजा फॅरो तुतनखामुनच्या थडग्याच्या बांधकामावर काम करायचा?''

''होय.'' इमेनी म्हणाला. मग त्यानं पुन्हा एकदा केवळ आपल्या आई-वडिलांच्या अंत्यविधीसाठी पुरेल एवढाच पैसा त्याला हवा होता, हे सांगितलं. त्यानं दयेची याचना केली. आपल्या बरोबरच्या लोकांनी आतली पवित्र जागा भ्रष्ट केली तेव्हा आपण ताबडतोब तिथून बाहेर पडून स्वत:च हे सगळं पहारेकऱ्यांना सांगून शरण आलो, हे त्यानं पुन्हा एकदा सांगितलं.

नीलमण्यासारख्या स्वच्छ निळ्या आकाशात घिरट्या घालणाऱ्या एका ससाण्याकडे नेनेफ्ताची नजर गेली. त्याचं लक्ष आता निराळ्याच ठिकाणी जात होतं. थडगं फोडलं जाण्याच्या प्रसंगामुळे तो अस्वस्थ झाला होता. आपण महान पहिला सेती राजाच्या थडग्याचं बांधकाम सुरक्षित व्हावं म्हणून प्रयत्न करत असताना अशा प्रकारे चोरांनी सहज थडग्यात शिरावं हे बघून त्याला धक्का बसला होता. त्यानं पुन्हापुन्हा दयेची याचना करणाऱ्या इमेनीचं बोलणं मध्येच तोडलं.

''तू सध्या फॅरो सेतींच्या थडग्याच्या बांधकामावर आहेस?''

इमेनी फक्त मान हलवू शकला. त्याला नेनेफ्ताची भीती वाटली. तोच काय, सगळेच जण नेनेफ्ताला विलक्षण घाबरत असत.

''आम्ही जे थडगं बांधतोय, तेदेखील फोडता येईल, असं तुला वाटतं?''

''जर पहारा नसेल तर कोणतंही थडगं फोडता येईल.''

नेनेफ्ताच्या तळपायातली आग मस्तकात गेली. या समोर पडलेल्या

मानव रूपातल्या तरसाला स्वत: बडवावं हा विचार त्यानं प्रयत्नपूर्वक मागे सारला. पण इमेनीला त्याचा राग समजला होता. तो बचावासाठी किंचित मागे सरकला. ''आणि... फॅरो व त्यांचा खजिना यांचं रक्षण आम्ही कसं करावं याबद्दल तुझ्या काही सूचना आहेत का?'' नेनेफ्तानं काही क्षणांनी विचारलं. रागाला आवर घातल्यानं त्याचा आवाज जरासा थरथरत होता.

इमेनीला काय बोलावं ते कळेना. तो मान असहायपणे खाली घालून गप्प राहिला. त्याला त्या क्षणी फक्त सत्य काय तेच सांगावंसं वाटत होतं.

''फॅरोंना सुरक्षित राखणं अवघड आहे,'' अखेर धीर करून इमेनी बोलू लागला, ''पूर्वीही फॅरोंना कधीच सुरक्षित राखणं शक्य नव्हतं आणि यापुढेही ते शक्यच नाही. त्यांची थडगी लुटली जातीलच.''

स्थूल शरीर असूनही नेनेफ्ता वेगानं उठला आणि त्यानं पालथ्या हातानं इमेनीला तडाखा लगावला. ''क्षुद्र माणसा! तू फॅरोंच्या बाबतीत असं उन्मत्तपणानं कसं काय बोलू शकतोस?'' नेनेफ्तानं त्याला पुन्हा मारण्यासाठी हात उचलला. पण तो लगेच थबकला. अगोदरच्या तडाख्याच्या वेळेसच त्याचा हात दुखत होता. मारण्याचा विचार बाजूला सारून त्यानं आपला उंची अंगरखा सावरला. ''तू थडगी फोडण्यात निष्णात आहेस असं दिसतंय. असं असताना या वेळी तुझा बेत असा कसा फसला?''

''नाही, मी तसा नाही, तसं असतं तर फॅरो तुतनखामुन यांचा खजिना बघून माझ्या साथीदारांची काय अवस्था होईल हे मला आधी समजलं असतं. आत्यंतिक हावेमुळे ते वेडेपिसे होऊन गेले.''

तिथं प्रखर प्रकाश असूनही नेनेफ्ताचे डोळे विस्फारले. त्याचा चेहरा वेडावाकडा झाला. हा बदल एवढ्या वेगानं झाला होता की एरवी सुस्त असलेल्या नेबमारे- नाख्तच्याही तो लक्षात आला. खजूर खात असताना त्याचा हात तोंडाजवळच थांबला.

''महाराज... ठीक आहात ना?'' नेबमारे-नाख्त नेनेफ्ताचा चेहरा नीट दिसावा म्हणून पुढे झुकला.

◆

**१६ डिसेंबर २०२४ ते १५ जानेवारी २०२५ दरम्यानचा दिनविशेष**

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **विशेष सवलत**

**खालील संचांवर १६ ते ३१ डिसेंबर दरम्यान खास सवलत**

**१६ डिसेंबर - जॅन येगर यांचा जन्मदिन**

'मैत्री अशी आणि तशी', 'वर्क लेस, डू मोअर' या पुस्तकांवर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ५४५/- । सवलत किंमत ३९९/-**

---

**१६ डिसेंबर - विजय दिवस**

'परमवीर चक्र' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १२९/-**

---

**२० डिसेंबर - मॅथ्यू ग्लास यांचा जन्मदिन**

'एन्ड गेम', 'अल्टिमेटम' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**मूळ किंमत ९४०/- । सवलत किंमत ५४९/-**

---

**२० डिसेंबर - प्रतिमा कुलकर्णी यांचा जन्मदिन**

'रुजवाई' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १७९/-**

---

**२१ डिसेंबर - यू. आर. अनंतमूर्ती यांचा जन्मदिन**

'संस्कार', 'अवस्था' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**मूळ किंमत २९०/- । सवलत किंमत १९९/-**

---

**२३ डिसेंबर - किसान दिवस**

'आधुनिक द्राक्ष लागवड', 'विपुलाच सृष्टी', 'केल्याने होत आहे रे', 'सुंदर आपली फुलबाग', 'सुंदर आपली फळबाग', 'शेती करू फायद्याची', 'बोन्साय', 'घरातील बाग', 'छंद बागेचा', 'कॉर्पोरेटला रामराम शेतीला सलाम', 'मळ्याची माती', 'मातीचे मम अवघे जीवन', 'हल्या हल्या दुधू दे!', 'शेतकऱ्याचा असूड' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २७५५/- । सवलत किंमत १९३०/-**

---

**२४ डिसेंबर - मधुवंती सप्रे यांचा जन्मदिन**

'ध्यासपर्व' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १६२/-**

**२४ डिसेंबर - सुरेशचंद्र नाडकर्णी यांचा जन्मदिन**

'गज़ल', 'नॉस्त्रादेमसची भविष्यवाणी', 'पृथ्वीवर माणूस उपराच', 'अज्ञाताचे विज्ञान' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८१०/- । सवलत किंमत ५५४/-**

**२४ डिसेंबर - भारतीय ग्राहक दिन**

'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या सर्व पुस्तकांवर (प्रत्येकी १ प्रत) ४०% सवलत. ही सवलत नेट २५००/- व अधिकच्या खरेदीवर लागू.

**(ही सवलत फक्त २४ डिसेंबर या एक दिवसासाठी आहे.)**

**२५ डिसेंबर - प्रज्ञा ओक यांचा जन्मदिन**

'बुक मार्क' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १९५/- । सवलत किंमत १३९/-**

**२५ डिसेंबर - ख्रिसमस**

बालसाहित्याच्या २५००च्या खरेदीवर ४०% सूट

**(ही सवलत फक्त २५ व २६ डिसेंबर या दोन दिवसांसाठी आहे.)**

**२८ डिसेंबर - बाबा आमटे यांचा जन्मदिन**

'अमरगीत' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १७९/-**

**२८ डिसेंबर - जॉन ग्रे यांचा जन्मदिन**

' 'स'सुखाचा', 'तो आणि ती', 'तुला आठवताना' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८९०/- । सवलत किंमत ६०२/-**

**२८ डिसेंबर - डेव्हिड ॲलन यांचा जन्मदिन**

'गेटिंग थिंग्ज डन' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २७९/-**

**२९ डिसेंबर - भावेश भाटिया यांचा जन्मदिन**

'रुक जाना नही' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २४५/-**

**३० डिसेंबर - जयसिंगराव पवार यांचा जन्मदिन**

'आमच्या इतिहासाचा शोध आणि बोध', 'छत्रपती संभाजी : एक चिकित्सा', 'मराठेशाहीचे अंतरंग', 'मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध', 'राजर्षी शाहू छत्रपती : एक मागोवा', 'राजर्षी शाहू छत्रपती : पत्रव्यवहार आणि कायदे', 'राजर्षी शाहू छत्रपतींचे जाहीरनामे व हुकूमनामे', 'राजर्षी शाहू छत्रपतींची भाषणे', 'राजर्षी शाहू, कर्मवीर भाऊराव पाटील आणि प्रबोधनकार ठाकरे', 'शिवचरित्रापासून आम्ही काय शिकावे', 'शिवछत्रपती एक मागोवा', 'राजर्षी शाहू छत्रपती : एक अभ्यास', 'समाजक्रांतिकारक राजर्षी शाहू छत्रपती', 'क्रांतिसिह नाना पाटील', 'वेध अमुच्या इतिहासाचा', 'छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ', 'व्यक्तिवेध : शरद पवार ते गोविंद पानसरे', 'युवराज संभाजीराजे आणि सती गोदावरी', 'शिवछत्रपतींची स्वराज्याची संकल्पना', 'राजर्षी शाहू छत्रपती आणि सामाजिक न्याय', 'दादाजी कोंडदेव कोण होता?' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ६८८५/- । सवलत किंमत ४९५७/-**

**३१ डिसेंबर - मेगन चान्स यांचा जन्मदिन**

'द स्पिरिच्युअॅलिस्ट' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३२०/- । सवलत किंमत १७९/-**

**खालील संचांवर १ ते १५ जानेवारी २०२५ दरम्यान खास सवलत**

**१ जानेवारी - मायकेल गेट्स गिल यांचा जन्मदिन**

'हाऊ स्टारबक्स सेव्ह्ड माय लाइफ' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३२०/- । सवलत किंमत २१९/-**

**१ जानेवारी - तान त्वान एंग यांचा जन्मदिन**

'द गिफ्ट ऑफ रेन' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४४०/- । सवलत किंमत २२९/-**

**१ जानेवारी - पॉल कार्सन यांचा जन्मदिन**

'बिट्रेयल' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १३९/-**

**१ जानेवारी - अॅनी बरोज यांचा जन्मदिन**

'गर्नसी वाचक मंडळ' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १२९/-**

**१ जानेवारी - नादिया मुराद यांचा जन्मदिन**

'द लास्ट गर्ल' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४६०/- । सवलत किंमत ३२५/-**

**१ जानेवारी - सॅम ख्रिस्टर यांचा जन्मदिन**

'द स्टोनहेंज लेगसी' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४५०/- । सवलत किंमत ३१९/-**

**२ जानेवारी - ए. जे. फिन यांचा जन्मदिन**

'द वुमन इन द विंडो' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ६३०/- । सवलत किंमत ४७२ /-**

'द वुमन इन द विंडो' या पुस्तकावर विशेष सवलत

**३ जानेवारी - ग्रेटा थुनबर्ग यांचा जन्मदिन**

'ग्रेटाची गोष्ट' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १२५/- । सवलत किंमत ८९/-**

**३ जानेवारी - जसवंत सिंग यांचा जन्मदिन**

'ए कॉल टू ऑनर', 'जिना' या पुस्तकांवर विशेष सवलत

**मूळ किंमत ९५०/- । सवलत किंमत ४७९/-**

**३ जानेवारी - राजेंद्र खेर यांचा जन्मदिन**

'बिंदू सरोवर', 'उदयन', दिग्विजय' या पुस्तकांवर विशेष सवलत

**मूळ किंमत ११९५/- । सवलत किंमत ८३२/-**

**३ जानेवारी - सावित्रीबाई फुले जयंती**

'महात्मा (जोतिराव फुले)', 'मी मलाला', 'स्टोन्स इन्टू स्कूल', 'थ्री कप्स ऑफ टी', 'ज्ञानाई सावित्रीबाई फुले' या पुस्तकांवर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १८९५/- । सवलत किंमत ११२४/-**

**४ जानेवारी - कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी यांचा जन्मदिन**

'मराठी भाषा उद्‌गम व विकास' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत १९९/-**

**७ जानेवारी - शोभा डे यांचा जन्मदिन**

‘सिलेक्टिव्ह मेमरी’, ‘स्पीड पोस्ट’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८२०/- । सवलत किंमत ५५०/-**

**८ जानेवारी - स्टीफन हॉकिंग यांचा जन्मदिन**

‘जॉर्ज ॲन्ड द बिग बँग’, ‘जॉर्जेस कॉस्मिक ट्रेझर हंट’, ‘जॉर्जेस सिक्रेट की टू द युनिव्हर्स’, ‘जॉर्ज ॲन्ड द ब्ल्यू मून’, ‘जॉर्ज ॲन्ड द शिप ऑफ टाइम’, ‘जॉर्ज ॲन्ड द अनब्रेकेबल कोड’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २६७०/- । सवलत किंमत १८७०/-**

**८ जानेवारी - मार्क व्हिक्टर हॅन्सन यांचा जन्मदिन**

चिकन सूप मालिकेतील ६१ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १३२५०/- । सवलत किंमत ९२७५/-**

**९ जानेवारी - विल्बर स्मिथ यांचा जन्मदिन**

‘द सेव्हन्थ स्क्रोल’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ५५०/- । सवलत किंमत २७९/-**

**९ जानेवारी - शोभा चित्रे यांचा जन्मदिन**

‘एक दिवस’, ‘पानगळीच्या आठवणी’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४३०/- । सवलत किंमत २४९/-**

**१० जानेवारी - निरंजन घाटे यांचा जन्मदिन**

‘आल्फ्रेड रसेल वॅलेस’, ‘आपल्या पूर्वजांचे तंत्रज्ञान’, ‘आपल्या पूर्वजांचे विज्ञान’, ‘असे घडले सहस्त्रक’, ‘असे शास्त्रज्ञ असे संशोधन’, ‘ज्ञानदीप’, ‘फार फार वर्षांपूर्वी’, ‘जिज्ञासापूर्ती’, ‘ज्याचं करावं भलं’, ‘पर्यावरण प्रदूषण’, ‘रोबॉट फिक्सिंग’, ‘शास्त्रज्ञांचे जग’, ‘स्वप्नचौर्य’, ‘तरुणांनो होशियार’, ‘वसुंधरा’, ‘वेध पर्यावरणाचा’, ‘निसर्गपुत्र’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३८१०/- । सवलत किंमत २२८६/-**

**११ जानेवारी - अनू अगरवाल यांचा जन्मदिन**

‘अनू’प या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १७९/-**

**११ जानेवारी - वि. स. खांडेकर यांचा जन्मदिन**

एकूण ११९ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**मूळ किंमत १७,८७०/- । सवलत किंमत १२,९२२/-**

**१२ जानेवारी - स्वामी विवेकानंद जयंती व जागतिक युवा दिन**

'आधुनिक भारताचे प्रेषित स्वामी विवेकानंद', 'क्रांतियोगिनी भगिनी निवेदिता', 'चिकन सूप टीनएज सोल', 'चिकन सूप टीनएज सोल भाग २', 'चिकन सूप टीन एज सोल भाग ३', 'मैत्री अशी आणि तशी', 'स्वामी विवेकानंद', 'टीनएजर्स' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २०६५/- । सवलत किंमत १२३९/-**

---

**१२ जानेवारी - मृणालिनी गडकरी यांचा जन्मदिन**

'क्रांतियोगिनी भगिनी निवेदिता', 'आलो-अंधारी', 'अमार मेयेबेला', 'देवदास', 'काबुलीवाला आणि इतर कथा', 'काबुलीवाल्याची बंगाली बायको', 'मी धार्मिकता शिकवतो, धर्म नाही', 'नष्ट मेयेर नष्ट गद्य', 'निर्बाचित कविता', 'फेरा', 'पोस्टमास्तर आणि इतर कथा', 'तीन सांगातिणी', 'गांधर्वी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २६८०/- । सवलत किंमत १८४९/-**

---

**१४ जानेवारी - डेव्हिड कर्कपॅट्रिक यांचा जन्मदिन**

'द फेसबुक इफेक्ट' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २२९/-**

◆


**❖ किमतींमध्ये बदलाची शक्यता ❖**

**अधिक माहितीसाठी संपर्क :** फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२ / **Whats App No. ९४२०५९४६६५**

**website : www.mehtapublishinghouse.com**


**आपल्या लाडक्या लेखकांना शुभेच्छा !**

**या ईमेलवर पाठवा. author@mehtapublishinghouse.com**


## आवर्जून वाचावे असे काही



उत्तम योद्धा, महान प्रशासक,
अनेकतत्त्ववादाचा पुरस्कर्ता असलेल्या
अकबराच्या समग्र जीवनकालाचा
यथासांग पट मांडणारे चरित्र




मुघल सम्राटांपैकी सर्वांत आकर्षक
आणि कला व निसर्गसाधनेचा
परिपाठ गिरवणारा
संवेदनशील राजकुमार सलीम
अर्थात जहांगीरची जीवनगाथा




लेखक : **पार्वती शर्मा**
अनुवाद : **प्रशांत तळणीकर**

ebook available

**RNI. No. MAHMAR/2000/02739**
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 11/12/2024 Posting Date : 11/12/2024

## आवर्जून वाचावे...



















**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन - (०२०) २४४७६९२४

प्रति, ______________________

______________________

______________________

______________________

______________________

______________________

______________________